दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक १५ । शनिवार २४ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

इन्फोसिस करणार २० हजार फ्रेशर्सची भरती!

आघाडीची माहिती तंत्रज्ञान कंपनी इन्फोसिसने चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत ७,८२३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला असून, वार्षिक तुलनेत त्यात ६.२ टक्क्यांची वाढ झाली आहे. मागील वर्षी याच तिमाहीत कंपनीने ७,३६४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला होता. या निकालाचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारात पाहायला मिळू शकतो.

सरलेल्या सप्टेंबर तिमाहीत कंपनीचा एकत्रित महसूल १०.२ टक्क्यांनी वाढून ४९,२४४ कोटी रुपये झाला. मागील वर्षी याच कालावधीत हा महसूल ४४,४९० कोटी रुपये होता. कृत्रिम प्रज्ञा (एआय) क्षेत्रातील वाढती मागणी आणि मोठ्या व्यावसायिक करारांमुळे कंपनीच्या कामगिरीला आधार मिळाला.

विधान परिषदेच्या निकालात धक्कादायक उलथापालथ...

महायुती चार, महाविकास आघाडीला एक जागा..?

एक्झिट पोलचा अंदाज : पुणे, नागपूरमध्ये भाजपचे पारडे जड; छत्रपती संभाजीनगरमध्ये सतीश चव्हाणांना कौल, अमरावतीत काँग्रेसची सरशी?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : विधान परिषदेच्या पाच जागांसाठी शुक्रवारी उत्साहात मतदान पार पडले असून, आता २७ ऑक्टोबरच्या मतमोजणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. महायुती आणि म हाविकास आघाडीतील बंडखोरी, उमेदवारांची प्रतिष्ठा आणि मतविभाजनाच्या शक्यतेमुळे या निवडणुकीत मोठ्या राजकीय उलथापालथीचे संकेत मिळत आहेत. साम टीव्हीच्या एक्झिट पोलनुसार पाचपैकी चार जागांवर महायुती, तर एका जागेवर महाविकास आघाडी बाजी मारण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र, हे अंदाज असून अंतिम निकाल मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या स्मिता जाधव यांचे पारडे जड असल्याचा अंदाज आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या हर्षदा जाधव-देशमुख आणि उद्धव ठाकरे यांच्या



शिवसेनेचे सुनील मोदी यांच्या उमेदवारीमुळे येथे चुरस वाढली.

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे यांना अनुकूल वातावरण असल्याचे एक्झिट पोलमध्ये म्हटले आहे. त्यामुळे काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांच्यासमोर आव्हान निर्माण झाल्याचे चित्र आहे. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश चव्हाण चौथ्यांदा विजय मिळवतील, असा अंदाज आहे. त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीकडून डॉ. प्रतापसिंह पाटील यांना पाठिंबा देण्यात आला होता. शिवसेना ठाकरे गटाचे दिलीप घुगेही मैदानात असल्याने मतविभाजनाची शक्यता चर्चेत आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना अनुकूल कौल मिळण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. महायुतीतील बंडखोरीचा फटका शिवसेनेचे विद्यमान आमदार किरण सरनाईक यांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एक्झिट पोलचे हे अंदाज खरे ठरल्यास महायुतीला चार जागांचा फायदा होऊ शकतो, तर महाविकास आघाडीला एका जागेवर सम ाधान मानावे लागू शकते. मात्र, मतदारांचा प्रत्यक्ष कौल कोणाच्या बाजूने लागतो, हे २७ ऑक्टोबरला स्पष्ट होईल.

पुणे शिक्षक मतदारसंघ :

सचिन सानप यांचे पारडे जड; आसगावकर, गावडे यांच्यापुढे आव्हान

पुणे शिक्षक मतदारसंघात यंदा तिरंगी लढतीसह बंडखोरीमुळे राजकीय समीकरणे गुंतागुंतीची झाली आहेत. भाजपने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे विद्यमान आम दार जयंत आसगावकर मैदानात आहेत. माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनीही निवडणुकीत रंगत आणली.

शिवसेनेकडून इच्छुक असलेले सचिन सानप यांनी बंडखोरी करून अपक्ष अर्ज दाखल केला. त्यांना शिवसेनेचा पाठिंबा मिळाल्याने लढत अधिक चुरशीची झाली. साम टीव्हीच्या एक्झिट पोलने सानप यांचे पारडे जड असल्याचा अंदाज वर्तविला आहे. हा अंदाज खरा ठरल्यास महायुतीच्या अधिकृत उमेदवाराला मोठा धक्का बसू शकतो.



दिवाळीनंतर अहिल्यानगरच्या रस्त्यांवर ४० ई-बसेस धावणार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

शहर बससेवेचा विस्तार, पाणीगळती रोखण्यावरही भर

अहिल्यानगर : शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर बससेवेत ४० नवीन इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत. दिवाळीनंतर तातडीने ही बससेवा सुरू करण्यात येणार असून, त्यामुळे शहरासह परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

दैनिक राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या वतीने दिल्ली येथे आयोजित समारंभात आयुक्त डांगे यांना 'सह्याद्री प्रशासन रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यानंतर त्यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी संपादक करण नवले, वृत्तसंपादक किरण बोरुडे, जाहिरात व्यवस्थापक महादेव नजन, आकाश शिंदे आणि ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल शिंदे उपस्थित होते.

आयुक्त डांगे म्हणाले, शहरातील नागरी समस्या सोडविण्यासाठी म हापालिकेचे सर्व विभाग तत्परतेने काम करीत आहेत. शहरातील बहुतांश रस्त्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. निधीअभावी रखडलेली कामेही लवकर सुरू करण्याचा प्रयत्न आहे. शहराच्या सुशोभीकरणावरही भर दिला जात आहे.

शहर बससेवेचा विस्तार

केंद्र सरकारच्या पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत अहिल्यानगरसाठी ४० इलेक्ट्रिक बस मंजूर झाल्या आहेत. या बससाठी केडगाव येथे चार्जिंग केंद्र आणि बस डेपो उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नव्या बसमुळे शहरातील तसेच परिसरातील प्रवाशांना अधिक सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. शहर आणि परिसरातील पर्यटनाला चालना देण्यासाठी मोफत बससेवा उपलब्ध करून देण्याचाही विचार असल्याचे डांगे यांनी सांगितले.

पाणीगळती रोखण्याला प्राधान्य

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी कपात लागू करण्यात आली आहे. अहिल्यानगर शहरातही दहा टक्के कपात झाल्याने दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. यापुढे अधिक कपात करण्याची वेळ येऊ नये, यासाठी मुळा धरणाकडून शहरात येणाऱ्या मुख्य जलवाहिनीसह शहरातील पाणी वितरण वाहिन्यांची दुरुस्ती आणि पाणीगळती रोखण्यावर प्राधान्याने भर देण्यात येत असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

'फेसबुक किंग' बंटी दीक्षितची भररस्त्यात निर्घृण हत्या!

मित्रानेच कारने दुचाकीला धडक देत लोखंडी रॉडने केला हल्ला; हत्येनंतर आरोपी पोलिसांत हजर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संभाजीनगर : सोशल मीडियावर 'फेसबुक किंग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवेश चंद्रेश दीक्षित ऊर्फ बंटी दीक्षित (वय ३५) यांची शहरातील सिडको एन-७ परिसरात भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आली. गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास बजरंग चौकातील वर्दळीच्या रस्त्यावर ही घटना घडली. जुन्या मित्रासोबत झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक संशय असून, पवन पराशर याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बंटी दीक्षित हा व्यायामशाळेतून घरी परतत असताना पवन पराशर त्याचा पाठलाग करीत होता. एका पानटपरीजवळ दोघांची भेट झाली. यावेळी त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर बंटी दुचाकीवरून घराच्या दिशेने निघाला. मात्र, पवनने त्याचा पुन्हा पाठलाग केला आणि बजरंग चौकात कारने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेमुळे बंटी दुचाकीवरून फेकला जाऊन कारच्या काचेवर आदळला. त्यानंतर रस्त्यावरील दुभाजकावर पडला. पवनने कार



...अशी झाली 'फेसबुक किंग' ओळख

छत्रपती संभाजीनगरमधील देवेश चंद्रेश दीक्षित ऊर्फ बंटी दीक्षित (वय ३५) हा काही वर्षांपूर्वी फेसबुकवरील छायाचित्रे आणि चित्रफितींमुळे 'फेसबुक किंग' म्हणून लोकप्रिय झाला होता. सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहता वर्ग होता. तो भोजनालय आणि भूखंड खरेदी-विक्रीच्या व्यवसायात सक्रिय होता.

रस्त्यात आडवी लावली आणि लोखंडी रॉड घेऊन बंटीवर हल्ला केला. त्याच्या चेहऱ्यावर गंभीर वार झाल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हल्ल्यानंतर आरोपी कारमधून निघून गेल्याचे सांगण्यात येते.

या घटनेनंतर पवन पराशर सिडको पोलिस ठाण्यात हजर झाल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. आरोपीच्या कारमधून चाकू आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. बंटी दीक्षित हा काही वर्षांपूर्वी फेसबुकवरील छायाचित्रे आणि चित्रफितींमुळे तरुणांमध्ये लोकप्रिय झाला होता. त्याला सोशल मीडियावर मोठा चाहता वर्ग होता. त्यानंतर त्याने इन्स्टाग्रामवरही चित्रफिती प्रसिद्ध केल्या. तो भोजनालय चालविण्यासह भूखंड खरेदी-विक्रीच्या व्यवसायात सक्रिय होता. सामाजिक कार्यातही त्याचा सहभाग असल्याचे सांगितले जाते. व्यावसायिक वादातून ही हत्या झाली का, याचा तपास पोलिस करीत आहेत.

रामदास कदमांनी महायुतीत मिठाचा खडा टाकू नये!

मंत्री नितेश राणेंचा सल्ला; 'कदमांची भूमिका शिंदेंना मान्य आहे का?'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : मनोज जरांगे पाटील यांच्या कथित ध्वनिफितीवरून भाजपवर टीका करणारे शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी महायुतीमध्ये मि ठाचा खडा टाकू नये. त्यांच्या भूमिकेमुळे उद्धव ठाकरे यांना आनंद होत असेल, तर त्यांनी असे वागू नये, असा टोला भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी शुक्रवारी अहिल्यानगरमध्ये लगावला. कदम यांची भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मान्य (पान ४ वर)

फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर गोळीबार; नंतर स्वत:लाच संपवले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सावेडीतील शिवनगरमधील घटना; कापूरवाडी घाटात तरुणाचा मृतदेह आढळला, कारणाचा शोध सुरू

अहिल्यानगर : शहरातील सावेडी परिसरातील शिवनगर येथे एका फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर गावठी पिस्तुलातून गोळीबार करणाऱ्या तरुणाने काही तासांनंतर स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. योगेश सोमनाथ डोंगरे (रा. झारेकर गल्ली, नालेगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी घडलेल्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, गोळीबारामागील नेमके कारण शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

सावेडीतील एकवीरा चौक ते निर्मलनगर रस्त्यावरील शिवनगर परिसरात अनेक अपार्टमेंट आहेत. याच परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या महिलेच्या घरात योगेश डोंगरे शुक्रवारी दुपारी घुसला. त्याने गावठी पिस्तुलातून महिलेवर गोळीबार केला. यात महिला गंभीर जखमी झाली. गोळीबारानंतर योगेश घटनास्थळावरून पसार झाला. शेजाऱ्यांनी घटनेची माहिती महिलेच्या कुटुंबीयांना दिल्यानंतर तिला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्गे, शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे आणि पोलिस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पुरावे गोळा करण्यासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकालाही पाचारण करण्यात आले. दरम्यान, अहिल्यानगर-आगडगाव रस्त्यावरील कापूरवाडी शिवारातील घाटात मायंबा मंदिराजवळ एका तरुणाने स्वतःवर गोळी झाडल्याची माहिती सायंकाळी भिंगार कॅम्प पोलिसांना मिळाली. सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री थोरात (पान ४ वर)

केळ तलावातील गाळ कधी काढणार? मंत्री निलेश राणेंचा अधिकाऱ्यांना जाब !

चिचोंडी पाटील येथे तलावाची पाहणी; मच्छीमारांना मदतीचे आश्वासन, पावसाअभावी व्यवसाय संकटात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

चिचोंडी पाटील : नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील केळ तलावाची मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री निलेश राणे यांनी पाहणी करून मच्छीमारांच्या सम स्या जाणून घेतल्या. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने तलावातील पाणीसाठा आटला असून, त्याचा मोठा परिणाम तलावावर अवलंबून असलेल्या मच्छीम ारांच्या व्यवसायावर झाला आहे. या परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या मच्छीमारांशी मंत्री राणे यांनी थेट संवाद साधला आणि त्यांना मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी तलावातील गाळ काढण्याच्या प्रलंबित प्रश्नावर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा करत कामाबाबत ठोस माहिती देण्याची मागणी केली.





यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने केळ तलावातील पाणीसाठा घटला आहे. परिणामी, मच्छीमारी व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. तलावातील पाण्याची सद्यस्थिती, व्यवसायावर झालेला परिणाम आणि मच्छीमारांना भेडसावणाऱ्या अडचणी याबाबत मंत्री राणे यांनी त्यांच्याशी चर्चा केली. मच्छीमारांना या संकटातून दिलासा मिळावा, यासाठी मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान तलावातील गाळ काढण्याचा प्रश्नही या पाहणीदरम्यान ऐरणीवर आला. केळ तलावातील गाळ कधी काढणार? असा सवाल उपस्थित करत राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र, या कामाबाबत अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. तलावातील गाळ काढण्याच्या कामाचे नियोजन, त्यासाठीची प्रक्रिया आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची कालमर्यादा याबाबत स्पष्टता आवश्यक असल्याचे या वेळी अधोरेखित झाले. (पान ४ वर)

मच्छीमारांना मदतीचे आश्वासन

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने केळ तलावातील पाणीसाठा आटला असून, मच्छीमारी व्यवसायावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. तलावावर अवलंबून असलेल्या मच्छीमारांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी निलेश राणे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या समस्या समजून घेत मच्छीमारांना मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

गाळ काढण्याबाबत अधिकाऱ्यांना जाब

केळ तलावातील गाळ काढण्याचे काम कधी सुरू होणार, अशी विचारणा निलेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली. मात्र, याबाबत ठोस माहिती मिळाली नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. तलावातील गाळ काढण्याचे नियोजन आणि काम सुरू होण्याची कालमर्यादा प्रशासनाने स्पष्ट करावी, अशी मागणी या पाहणीच्या निमित्ताने पुढे आली आहे.

मला बोलवा मी नक्की येईल

चिचोंडी पाटील येथील भाजपा महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंत्री निलेश राणे यांचा पुस्तक भेट देऊन छोटेखानी सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर यांनी चिचोंडी पाटील येथील प्रबोधन व्याख्यानमालेविषयी मंत्री निलेश राणे यांना माहिती दिली. व्याख्यानमालेच्या उपक्रम ाबद्दल जाणून घेतल्यानंतर मला व्याख्यानमालेसाठी निमंत्रित करा मी नक्की येईन अशी इच्छा मंत्री राणे यांनी व्यक्त केली. त्यांच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

धोरणांचा लंबक, शेतकऱ्यांचा फटका!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

इथेनॉल धोरणातील घुमजाव; साखर उद्योगाच्या गुंतवणुकीचे काय?

सरकारचे धोरण हे दूरदृष्टीवर आधारित असावे, क्षणिक निर्णयांवर नव्हे. मात्र इथेनॉलच्या बाबतीत केंद्र सरकारची भूमिका पाहिली, तर धोरणात्मक सातत्यापेक्षा सोयीनुसार बदलणाऱ्या निर्णयांचेच दर्शन घडते. कालपर्यंत उसापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देणारे सरकार आज त्याच निर्मितीवर निर्बंध आणत असेल, तर या घुमजावाचा जाब विचारलाच पाहिजे. सरकारच्या प्रोत्साहनावर विश्वास ठेवून कोट्यवधींची गुंतवणूक करणाऱ्या साखर कारखान्यांनी कोणाच्या भरवशावर हे पाऊल उचलले? दुष्काळामुळे पाण्याचे महत्त्व अधोरेखित होत असले, तरी आधी प्रोत्साहन द्यायचे आणि नंतर धोरण बदलून गुंतवणूकदारांना अडचणीत टाकायचे, हा कारभार निश्चितच समर्थनीय नाही.

इथेनॉल निर्मितीमागे साखरेचे अतिरिक्त उत्पादन कमी करणे, इंधन आयात घटवणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे, अशी उद्दिष्टे मांडण्यात आली. त्यानुसार कारखान्यांनी प्रकल्प उभारले. मात्र आता उसाऐवजी मक्यापासून इथेनॉल निर्मितीला प्राधान्य देण्याची भूमिका पुढे येत आहे. पाण्याच्या मर्यादांचा विचार उशिरा का होईना, सरकारला झाला असेल तर स्वागतच; पण आधीच्या निर्णयांची जबाबदारी कोण घेणार? साखर उद्योग हा केवळ कारखानदारांचा व्यवसाय नसून त्यावर शेतकरी, कामगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोठे चक्र अवलंबून आहे. त्यामुळे धोरणातील बदलाचे परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत.

महाराष्ट्रासह अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असताना ऊस पिकासाठी होणारा मोठा पाणीवापर चिंतेचा विषय आहे. पावसावर अवलंबून असलेल्या प्रदेशात पाण्याची उपलब्धता न तपासता ऊस उत्पादनाला प्रोत्साहन देणे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. मात्र या वास्तवाचे भान धोरण आखतानाच असायला हवे होते. दुष्काळ पडल्यानंतरच जाग येणे, हे नियोजनाचे अपयश आहे. त्याचवेळी उसापासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध आणून मक्याला प्राधान्य दिल्यास अन्नसुरक्षा आणि पशुखाद्याच्या उपलब्धतेवर काय परिणाम होतील, याचाही विचार आवश्यक आहे.

देशाला खाद्यतेल आणि डाळींच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असताना मक्याच्या औद्योगिक वापराला प्रोत्साहन देण्याचे गणित तपासावे लागेल. मका लागवडीला वाढती मागणी मिळाल्याने शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते; परंतु इतर जीवनावश्यक पिकांचे क्षेत्र घटल्यास आयातीवरील अवलंबित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका बाजूला इंधनासाठी देशांतर्गत पिकांचा वापर वाढवायचा आणि दुसऱ्या बाजूला खाद्यतेल, डाळी यांसाठी परदेशावर अवलंबून राहायचे, हा विरोधाभास आहे. ऊर्जा स्वावलंबन महत्त्वाचे असले, तरी अन्नसुरक्षेची किंमत मोजून ते साधता कामा नये.

भारत-अमेरिका व्यापार चर्चेच्या पार्श्वभूमीवर मक्याच्या वापराचा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. अमेरिकेतील जनुकीय सुधारित मक्याच्या थेट आयातीवर भारतात मर्यादा असताना त्यापासून तयार होणाऱ्या पशुखाद्याच्या आयातीचा प्रश्न वेगळा आहे. भारतीय मक्याचा इथेनॉलसाठी वापर वाढवताना परदेशी पशुखाद्याची आयात वाढणार असेल, तर त्याचे परिणाम तपासले पाहिजेत. यामागे विशिष्ट व्यापारविषयक हेतू असल्याचे पुराव्याशिवाय म्हणता येणार नाही; मात्र कृषी धोरण आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यांचा परस्परसंबंध पारदर्शक असणे आवश्यक आहे.

या प्रकरणात साखर कारखानदारांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. राजकीय सत्तेशी जवळीक ठेवल्याने आपले व्यावसायिक हित सुरक्षित राहील, असा विश्वास धोकादायक आहे. सरकारच्या प्रोत्साहनावर गुंतवणूक करताना बाजारपेठ, कच्च्या मालाची उपलब्धता, पाणीवापर आणि धोरणातील संभाव्य बदल यांचा स्वतंत्र विचार करणे उद्योगांचीही जबाबदारी आहे. मात्र सरकारने प्रोत्साहन देऊन गुंतवणूक करवून घेतल्यानंतर अचानक निर्बंध आणणेही योग्य नाही. धोरण बदल अपरिहार्य असू शकतात; पण त्यासाठी संक्रमणकालीन व्यवस्था, स्पष्ट कालमर्यादा आणि गुंतवणुकीचे नुकसान टाळणारे उपाय आवश्यक आहेत.

इथेनॉलचा प्रश्न केवळ साखर उद्योगापुरता मर्यादित नाही. तो पाणी व्यवस्थापन, शेती, अन्नसुरक्षा आणि ऊर्जा स्वावलंबनाशी जोडलेला आहे. त्यामुळे सरकारने भावनेपेक्षा वस्तुनिष्ठ अभ्यासाच्या आधारे निर्णय घ्यावेत. उसापासून इथेनॉल निर्मितीवर मर्यादा आणताना आधीच्या गुंतवणुकीचे काय होणार, मक्याला प्राधान्य दिल्यास इतर पिकांवर काय परिणाम होणार आणि शेतकऱ्यांचे हित कसे जपले जाणार, याची उत्तरे द्यावी लागतील.

आज ऊस, उद्या मका आणि परवा दुसरेच पीक, असा धोरणांचा लंबक सतत हलत राहिला तर प्रत्येक झोक्याचा फटका शेतकरी आणि उद्योगांना बसेल. सरकारला घोषणांचा गाजावाजा करण्यापेक्षा पाणी, शेती, उद्योग आणि ऊर्जा यांचा समतोल साधणारे स्थिर, पारदर्शक आणि दूरदृष्टीचे धोरण आखावे लागेल. अन्यथा इथेनॉलच्या नावाने सुरू झालेला प्रवास सरकारी घुमजावाचा आणखी एक नमुना ठरेल.

राष्ट्रीय 'एकता परेड'साठी संजीवनी सैनिकी स्कूलचे ब्रास बँड पथक रवाना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत ब्रास बँड गटात देशात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बँड पथकाला आता गुजरातमधील एकतानगर येथे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या 'एकता परेड-२०२६' मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या राष्ट्रीय सोहळ्यात पथक आपले वादन कौशल्य सादर करणार आहे. या अभिमानास्पद कामगिरीच्या पार्श्वभूमीवर विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर शाळेच्या परिसरात लष्कराकडून प्राप्त रणगाडा व अन्य शस्त्रांचे, तसेच ब्रास बँडच्या वाद्यांचे पूजन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देवुन त्यांना रवाना करण्यात आले.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने ९ सप्टेंबर २०२६ रोजी पाठविलेल्या अधिकृत पत्रानुसार, संजीवनीच्या बँड पथकाची स्कूल बँड डीसप्ले मधील 'बॉईज ब्रास बॅन्ड' या श्रेणीसाठी निवड झाली आहे. २१ ऑक्टोबरपासून एकतानगर येथे देशभरातील सहभागी शालेय बँड पथकांसोबत संयुक्त सराव सुरू होणार असून, ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिनाच्या मुख्य कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

राष्ट्रीय स्पर्धेतील विजेतेपदापासून थेट राष्ट्रीय एकता दिनाच्या सोहळ्या पर्यंतचा हा प्रवास विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांची, जिद्दीची आणि संजीवनीतील शिस्तबद्ध प्रशिक्षणाची साक्ष देणारा आहे. या यशासाठी विद्यार्थ्यांनी अनेक दिवस सातत्याने सराव करून वादनातील अचूकता, ताल-लय, संचलनातील शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती आणि सांघिक समन्वय यांवर विशेष मेहनत घेतली. या यशात बँड प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, संगीत शिक्षक महेश गुरव यांचे योगदान, प्राचार्य कैलास दरेकर यांचे नियोजन, कल्चरल हेड शुभम जाधव यांचे सहकार्य, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत.

अक्षय ताठे यांची प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी तथा दिवाणी न्यायाधीशपदी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : पुणे जिल्ह्यातील शिरूरचे सुपुत्र कायदेतज्ज्ञ अक्षय पांडुरंग ताठे यांची महाराष्ट्र न्यायसेवे अंतर्गत सातारा जिल्ह्यात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी तथा दिवाणी न्यायाधीश पदी निवड झाली आहे.

त्यांच्या या निवडीमुळे शिरूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, इतक्या तरुण वयात न्यायाधीश पदापर्यंत मजल मारणारे ते शिरूर मधील पहिलेच युवक ठरले आहेत. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अक्षय ताठे यांनी आपल्या अथक परिश्रम, चिकाटी आणि कायद्याच्या सखोल अभ्यासाच्या जोरावर ही यशस्वी भरारी घेतली आहे. ग्रामीण भागातून येऊन न्यायव्यवस्थेतील अत्यंत मानाचे आणि जबाबदारीचे पद मिळवणे हे आजच्या स्पर्धात्मक युगात इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त गणेश ताठे यांचे पुतणे आहेत.



यावेळी किमान वेतन महामंडळाचे अध्यक्ष गणेश ताठे, भाजप युवा नेते नानासाहेब शिंदे पाटील, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत लांडगे, आशिष टोमणे उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या तांत्रिक विद्यालयाला स्व. अण्णासाहेब कदम यांचे नाव देणार

राज्यातील २५ शासकीय तांत्रिक विद्यालयाचे नामांतर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : राज्यातील २५ शासकीय तांत्रिक विद्यालयांचे नामांतर करण्याचा सरकारने जीआर काढल्याची खात्री लायक माहिती समजली असून तांत्रिक विद्यालयांना आता शास्त्रज्ञ , साहित्यिक , सामाजिक कार्यकर्ते यांची नावे देण्यात येणार आहे. यासंबंधीचे परिपत्रक सरकारने जारी केले आहे . अहिल्यानगरच्या तांत्रिक विद्यालयाला राहुरीचे भूमिपुत्र स्वर्गीय अण्णासाहेब कदम यांचे नाव देण्यात आले आहे . अहिल्यानगर शासकीय तांत्रिक विद्यालयाचे नवीन नामांतर आता अण्णासाहेब कदम शासकीय तांत्रिक विद्यालय, अहिल्यानगर असे राहणार आहे . राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जुने प्रचारक व देवळाली प्रवरा येथे न्मलेल्या अण्णासाहेब कदम पाटील यांनी त्या काळात तालुक्यात दुष्काळात विमोचन समिती व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून कार्य केले आहे . राहुरी साखर कारखान्याचे संस्थापक म्हणून देखील ते ओळखले जातात . त्यांच्या नावाने देवळाली प्रवरा येथे आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठाण (लक्ष्मणबाग) प्रतिष्ठाण गेल्या ३३ वर्षांपासून शेतकरी प्रशिक्षण, ग्रामविकास ,महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण , आरोग्य , जलसंधारण , संवर्धन या क्षेत्रात कार्यरत आहे.

सह्याद्रीच्या कुशीत पायरेन्स आयबीएमएच्या विद्यार्थ्यांची साहसी भरारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने पायरेन्स आयबीएमए महाविद्यालयाच्या सहभागातून ऐतिहासिक रतनगड किल्ल्यावर साहसी ट्रेकिंग मोहिमेचे आयोजन करण्यात आले. सह्याद्रीच्या निसर्गरम्य पर्वतरांगांमध्ये पार पडलेल्या या मोहिमेत विद्यार्थ्यांनी साहस, आत्मविश्वास, चिकाटी आणि संघभावनेचा अनुभव घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रवरा नदीच्या उगमस्थळालाही भेट दिली.

पायरेन्स संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या



माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांच्या संकल्पनेतून, तसेच संस्थेचे सचिव व संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

रतनगडाच्या डोंगरवाटा, उंच कडे आणि दऱ्याखोऱ्यांतून मार्गक्रमण करताना विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा अनुभव घेता आला. ट्रेकिंगमुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक कणखरपणा, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले. एकमेकांना मदत करत आव्हानांचा सामना केल्याने त्यांच्यातील संघभावना अधिक दृढ झाली.

मोहिमेदरम्यान विद्यार्थ्यांनी प्रवरा नदीच्या उगमस्थळाला भेट देऊन नदीचे भौगोलिक व पर्यावरणीय महत्त्व जाणून घेतले. शेती, पिण्याचे पाणी आणि परिसरातील जनजीवनासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या नदीच्या उगमस्थळाच्या भेटीतून जलस्रोत संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनुभवाधारित शिक्षणाला प्राधान्य देणारी ही मोहीम विद्यार्थ्यांसाठी साहस, ज्ञान आणि आनंद यांचा संगम ठरली. वर्गाबाहेरील अनुभवातून आत्मविश्वास, नेतृत्वक्षमता आणि सामूहिक कार्याची वृत्ती विकसित करण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे या मोहिमेतून अधोरेखित झाले.

रेल्वेत प्रवाशांना मारहाण करून लूट कारवाई न झाल्यास महाराष्ट्रात रेल्वे रोको आंदोलन - जोएफ जमादार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : कोपरगांव रेल्वे स्थानकावर महाराष्ट्र एक्सप्रेसमधील प्रवाशांना मारहाण करून सोन्याचे दागिने लुटल्याचा गंभीर आरोप समाजवादी पार्टीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष जोएफ जमादार यांनी केला आहे. या घटनेवेळी रेल्वे पोलीस उपस्थित असूनही त्यांनी प्रभावी हस्तक्षेप केला नसल्याचा आरोप करत संबंधित आरोपींसह दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी वरिष्ठ रेल्वे व लोहमार्ग पोलीस अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता ट्रेन क्रमांक ११०४० महाराष्ट्र एक्सप्रेसच्या एस-५ डब्यात ही घटना घडल्याचे निवेदनात म्हटले आहे. जळगांव ते श्रीरामपूर प्रवास करणाऱ्या महिला, मुले व पुरुष प्रवाशांना मारहाण करून त्यांचे दागिने लुटल्याचा आरोप करण्यात आला आहे.सीसीटीव्ही फुटेज व मोबाईल चित्रीकरणाच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करावी, तसेच दोषींवर निलंबनासह कठोर कारवाई करावी, अशी मागणी जमादार यांनी केली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षेची हमी देऊन या प्रकरणात तातडीने कारवाई करावी; अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात रेल्वे रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. निवेदन देतेवेळी समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष जोएफ जमादार, शाहरुख कुरैशी, याकूब शाह,अबरार शेख, फिरोज कुरैशी,अफरोज़ शाह,मोसिन शेख, अक्रम शाह, समीर सैय्यद, फिरोज शाह,अय्यूब शाह, रेहान शाह,शोएब शाह, रफीक शाह, मोसिन कुरैशी, हुसैन कुरैशी आदि उपस्थित होते.

राज्य पोलीस पाटलाचे वाढीव मानधन राज्य सरकारच्या विचारधीन : डोळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई : महाराष्ट्र राज्यात सुमारे ३६ हजार असलेल्या पोलीस पाटलाचे वाढीव मानधन देण्याचा शासनाचा विचार असून सदरचा प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित असल्याची माहिती नेवासा तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष रमेश डोळे यांनी दिली. राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी दोनदा पोलीस पाटलांचे मानधनचा प्रश्न मार्गी लावून त्यांचे मानधन वाढवून जीवनामध्ये अमुलाग्र बदल केले,व धोरण राबवले आहे. सध्या महागाई व इतर खर्च पाहता देण्यात येणारे मानधन तुटपुंजे आहे. सध्या पोलीस पाटलावर अनेक शासनाच्या जबाबदाऱ्या देण्यात आलेले असून याकरिता त्यांना वेळ व पैसा खर्च करावा लागतो म्हणून शासनाने समिती गठीत करून याबाबतचा अहवाल मागवला असल्याची खात्रीलायक माहिती आहे. केंद्र सरकारच्या महिला व बालविकास विभागाच्या शिफारशीनुसार अंगणवाडी सेविकांना मानधन वाढवलेले आहे, त्या समितीने राज्य सरकारला निर्देश दिलेले असून राज्यातील पोलीस पाटलांचे वाढीव मानधनाबाबत लवकरच निर्णय घ्यावा, असे केंद्राने सुचवलेले आहे, म्हणून प्रलंबित असलेला पोलीस पाटील मानधनाचा निर्णय काय होतो? त्याकडे सर्वांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

श्रीरामपूर येथे दि. २७ रोजी महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : महसुली न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले जमिनीविषयक दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी शासनाने 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' सुरू केले आहे. या अभियानांतर्गत श्रीरामपूर तालुक्यात मंगळवारी दि. २७ रोजी विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

महसूल न्यायालयांतील



प्रलंबित प्रकरणांमुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. ही बाब लक्षात घेऊन शासनाने १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत अभियान राबविण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये दाव्यांची तडजोडीने आणि परस्पर संमतीने जलद निकाली काढण्यावर भर देण्यात येणार आहे.

दरखास्त दावे, रस्ता वहिवाटीचे दावे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १४३ अन्वये प्रकरणे, मामलतदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील कलम ५(२) अंतर्गत दावे, वारस नोंदी, अधिकार अभिलेख, ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे तसेच वाटपाची प्रकरणे यांचा यात समावेश आहे. श्रीरामपूर तहसील कार्यालयात सुरू असलेल्या संबंधित प्रकरणांतील नागरिकांनी (पक्षकारांनी) २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, श्रीरामपूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी केले आहे. या अभियानामुळे प्रलंबित महसुली वादांना सामंजस्यातून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धेवर आत्मा मालिक गुरुकुलचे वर्चस्व ३२ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव :- जिल्हास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत कोकमठाण येथील आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत आपले वर्चस्व सिध्द केले. या खेळाडूंनी विविध मैदानी क्रीडा प्रकारात पहिले तिन क्रमांक पटकावत आपल्या क्रीडानैपुण्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या गुरूकुलातील २४ मुले व ८ मुलींची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने लोणी येथील विखे पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर या क्रिडा स्पर्धा संपन्न झाल्या. १९ वर्षांखालील गटात सचिन वराठा, विपुल वळवी, रोहन कोंब, विवेक चौधरी, यशराज चव्हाण यांनी ४ ÷ १०० मीटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. याच गटातील सचिन वराठा, रोहन कोंब , आकाश ठाकरे



, प्रवीण धनगर आणि प्रतीक ठींगळे यांनी ४ ÷ ४०० मीटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवीला. रोहन कोंब याने लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक पटकावलाय प्रतीक ठींगळे याने ४०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक मिळवीला.१७ वर्षांखालील गटात प्रफुल्ल वसावे याने १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. तलवारे चेतन तलवारे याने ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक, किशो पावरा याने उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक, तर ११० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.बांबू उडी या क्रीडा प्रकारात रोहन पावरा आणि नैतिक चौधरी यांनी प्रथम क्रमांक, तर राजवीर पावरा दिलबरसिंग आणि गौरव गावित यांनी द्वितीय क्रमांक मिळवीला. मुलींच्या गटातही गुरुकुलच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन केले. १९ वर्षांखालील गटात उर्मिला महाले हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय तसेच क्रॉस कंट्री स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला. अश्विनी भोये हिने द्वितीय, प्रीती चौधरी हिने तृतीय क्रमांक मिळवला.१७ वर्षांखालील गटात भावना भोय हिने बांबू उडीमध्ये प्रथम तर प्रीती खर्डे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. १९ वर्षांखालील गटात पुजा ईभाड पूजा सुभाष हिने बांबू उडीमध्ये प्रथम क्रमांक तर पूनम पठ्ले हिने द्वितीय क्रमांक पटकावला. १४ वर्षांखालील गटात आराध्या गुड्ये हिने ८० मीटर हर्डल्स स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवीला. या खेळाडूंना प्रशिक्षक अजित पवार सर यांचे मार्गदर्शन लाभले.सद्गुरू आत्मा मालिक माऊली यांच्या आशीर्वादाने आणि संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, शैक्षणिक व्यवस्थापक सुधाकर मलिक, साईनाथ वरपे, मीरा पटेल तसेच गुरुकुलातील प्राचार्य माणिक जाधव , मीना काकडे, नितीन सोनवणे यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

भोकर ग्रामपंचायतीच्या निविदा प्रक्रियेवर गैरव्यवहाराचे आरोप

१५व्या वित्त आयोगाच्या कामांची चौकशीची सरपंच शीतल पटारे यांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर ग्रामपंचायतीच्या १५व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात येणाऱ्या विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप लोकनियुक्त सरपंच शीतल पटारे यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी निवेदनातून दिला आहे.

निवेदनानुसार, ग्रामविकास अधिकारी हितेश दुमणे आणि उपसरपंच गिरीश मते यांनी संगनमत करून सरपंचांना विश्वासात न घेता निविदा प्रक्रिया राबविल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामांचे कार्यारंभ आदेश आणि इतर कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचे, तसेच अन्य प्रकरणांत अडकविण्याची धमकी दिली जात असल्याचेही पटारे यांनी निवेदनात म्हटले आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या कामांसाठी २२ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत निविदा स्वीकारण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली होती. तसेच १ ऑक्टोबर रोजी निविदा उघडण्याचे नियोजन होते. मात्र, ही प्रक्रिया गोपनीय आणि नियमबाह्य पद्धतीने राबविण्यात आल्याचा दावा सरपंचांनी केला आहे. ग्रामस्थ आणि काही ठेकेदारांशी चर्चा केल्यानंतर या कथित गैरप्रकाराची माहिती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.



ग्रामसभेत १५व्या वित्त आयोगाची कामे बी-१ पद्धतीने करून ती गावातील ठेकेदारांना देण्याबाबत ठराव झाल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. तसेच ग्रामविकास अधिकारी वारंवार कार्यालयात गैरहजर राहत असल्याने ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून, ग्रामस्थांना विविध कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही पटारे यांनी म्हटले आहे.

निविदा प्रक्रियेतील कागदपत्रांची तपासणी करून पारदर्शक चौकशी करावी, नियमांचे उल्लंघन आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी आणि भोकर ग्रामपंचायतीसाठी पूर्णवेळ ग्रामविकास अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत श्रीरामपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपांबाबत संबंधित अधिकारी व उपसरपंच यांची भूमिका समोर आलेली नाही.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

टाटा मोटर्सकडील इन्सेंटिव्हसाठी माजी सेल्स मॅनेजरचा लढा आमरण उपोषणाचा इशारा

शिर्डी : राहाता येथील टाटा मोटर्सच्या विभागातील विक्री कामगिरीशी संबंधित सुमारे १२ लाख रुपयांची प्रोत्साहन रक्कम प्रलंबित मिळावी असा दावा पिपाडा मोटर्स, अहमदनगरचे माजी सेल्स मॅनेजर जितेंद्र बाळासाहेब जाधव यांनी केला आहे.जाधव हे २०१३ ते २०२५ या कालावधीत पिपाडा मोटर्स येथे सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत होते. त्यांच्या दाव्यानुसार, २०२२ ते २०२५ या कालावधीतील इन्सेंटिव्हची रक्कम अद्याप मिळालेली नाही. याबाबत ठाणे कार्यालयात प्रत्यक्ष चर्चा आणि ई-मेलद्वारे वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक लेखी उत्तर मिळाले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.इन्सेंटिव्ह गणना पत्रके, मंजुरी कागदपत्रे, अंतर्गत ई-मेल, नोंदी, गिफ्ट कार्ड व्यवहार आणि रक्कम रोखण्याबाबतचे आदेश तपासून निष्पक्ष चौकशी करावी, अशी त्यांची मागणी आहे. न्याय न मिळाल्यास पुढील आठवड्यात मुंबईतील बॉम्बे हाऊससमोर कुटुंबीयांसह आमरण उपोषण करणार असून वरिष्ठ व्यवस्थापनाने हस्तक्षेप करून लेखी निर्णय द्यावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रविवारी पथसंचलन

श्रीरामपूर : प्रतिवर्षी प्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या श्रीरामपूर शहर उपखंडाचे पथसंचलन आणि उत्सवाचे आयोजन रविवार दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. रविवार दिनांक २५ रोजी सायंकाळी ५ वा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथुन संपत होऊन मेनरोड शिवाजी रोड मार्गे दादा वामन जोशी नविन मराठी शाळा येथे संचलन संपन्न होणार आहे. त्यानंतर नविन मराठी शाळेत शस्त्रपुजन उत्सव आणि प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन आणि प्रमुख वक्त्याचे बौध्दिक होणार आहे. शहरातील सर्व नागरीक बंधू, माता-भगिनींना आणि स्वयं सेवकांना सहभागी होण्याचे आवाहन श्रीरामपूर तालुका संघ चालक अरविंद शहाणे यांचे वतीने करण्यात येत आहे.

आराध्या भालके चांदा केंद्रात प्रथम



चांदा : नेवासा तालुक्यातील चांदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यीनी आराध्या संतोष भालके हिने प्रथम क्रमांक मिळविला त्याबद्दल तीचा नुकताच शाळेच्या वतीने नुकताच सन्मान करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र सरकार शाळा चांदा येथे केंद्र पातळीवरील स्पेलिंग बी या स्पर्धा संपन्न झाल्या त्यात आराध्या संतोष भालके या मुलीने चांदा केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला जिद्द मेहनत व सातत्य या जोरावर तिने यश संपादन केले. त्याबद्दल तीचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. आराध्या हीला तीचे वर्ग शिक्षक व शाळेतील इतर शिक्षकांचे ही मोलाचे मार्गदर्शन लाभले याप्रसंगी मुख्याध्यापक संजय जावळे, मीना गर्जे, शांता दहातोंडे, सुभाष जाधव, सुनिता पुरी, शारदा दुसंग, शरद गोसावी, विजय बनकर, ओम जऱ्हाड यांच्या सह आदी उपस्थित होते.

डिग्रसमध्ये १५ वर्षांपासून रिक्त पदाच्या निवडीवरून ग्रामसभेत गोंधळ

तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपद निवडीवरून ग्रामसभा तहकूब

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील डिग्रस गावातील तंटे मिटविण्यासाठी असलेल्या तंटामुक्ती समिती अध्यक्षपदाच्या निवडीवरूनच ग्रामसभेत वाद निर्माण झाल्याची घटना डिग्रस येथे घडली आहे .तब्बल १५ वर्षांपासून रिक्त असलेल्या या पदाच्या निवडीसाठी गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, उमेदवारांमध्ये एकमत न झाल्याने ग्रामसभेत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अखेर सभा तहकूब करण्यात आल्याने अध्यक्षपदाची निवड अनिर्णित राहिली. गावातील तंटे मिटविणाऱ्या पदाच्या निवडीवेळीच तंट्याचा पेच निर्माण झाल्याने या घटनेची गावात चर्चा सुरू आहे. राहुरी तालुक्यातील डिग्रस ग्रामपंचायत ही तालुक्यातील प्रतिष्ठित ग्रामपंचायतींपैकी एक म्हणून ओळखली जाते. मात्र, गावातील तंटामुक्ती अध्यक्षपद गेल्या पंधरा वर्षांपासून रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी झालेल्या



ग्रामसभेत या पदाची निवड करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यामुळे यंदाच्या ग्रामसभेत तरी अध्यक्षपदाची निवड होऊन हा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती.

गुरुवारी सकाळी दहा वाजता ग्रामसभेच्या नियोजित कार्यक्रमाला सुरुवात झाली. ग्रामसभेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सकाळपासून दवंडी देण्यात आली होती. ग्रामसेवक महेश जंगम यांनी सभेचा अजेंडा वाचून दाखविला. त्यानंतर लोकनियुक्त सरपंच रेणुका गावडे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरू झाले. तंटामुक्ती अध्यक्षपदाच्या निवडीचा विषय चर्चेला येताच इच्छुकांमधील चुरस समोर आली. सुरुवातीला या पदासाठी चार उमेदवार इच्छुक होते. त्यानंतर त्यापैकी दोन उमेदवारांनी एकमेकांना पाठिंबा दिल्याने प्रत्यक्ष निवड प्रक्रियेत दोन उमेदवार उरले. मात्र, या दोघांमध्येही एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे अध्यक्षपदाची निवड करण्यासाठी मतदान प्रक्रिया राबविण्याची वेळ आली.

निवडीच्या मुद्द्यावरून ग्रामसभेत मतभेद वाढत गेले आणि काही वेळातच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सभेला उपस्थित असलेल्या महिला व ग्रामस्थांमध्येही गोंधळ उडाल्याने परिस्थिती हाताळण्याचे आव्हान निर्माण झाले. अध्यक्षपदाच्या निवडीबाबत एकमताचा मार्ग न निघाल्याने अखेर ग्रामसभा तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला. तब्बल पंधरा वर्षांपासून रिक्त असलेल्या तंटामुक्ती अध्यक्षपदाचा प्रश्न यंदाच्या ग्रामसभेतही सुटू शकला नाही. पुढील निवड प्रक्रिया कधी आणि कोणत्या पद्धतीने होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने ग्रामस्थांचे लक्ष पुढील निर्णयाकडे लागले आहे. गावातील वाद मिटविण्यासाठी असलेल्या समितीच्या अध्यक्षपदाची निवडच वादात अडकल्याने, पुढील ग्रामसभेत तरी हा तिढा सुटणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

पोलिसांचा बंदोबस्त; निवड मात्र अनिर्णित

ग्रामसभेदरम्यान परिस्थिती नियंत्रणात राहावी, यासाठी राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार विकास वैराळ, गणेश सानप तसेच पीएसआय पवार यांनी बंदोबस्त ठेवला होता. मात्र, गोंधळामुळे निवड प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी जमलेल्या ग्रामस्थांना निर्णयाविनाच परतावे लागले.

खा.गोविंदराव आदिक पतसंस्थेचा कारभार उत्तरोत्तर प्रगतीचाच : अनुराधा आदिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या वतीने काँग्रेस भवन, श्रीरामपूर येथे सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व वर्षभरात सेवानिवृत्त झालेल्या सभासदांचा कृतज्ञता सोहळा नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीरामपूर नगरपालिकेच्या प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक होत्या.प्रारंभी सरस्वतीच्या व खा. गोविंदराव आदिक यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या चेअरमन पुष्पलता गोविंदराव आदिक, अध्यक्ष डॉ. प्रा. बबनराव आदिक, सचिव मा. आविनाश आदिक व सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचा कारभार सभासदाभिमुख असुन उत्तरोत्तर प्रगतीचाच आहे.



सेवानिवृत्त सभासदांनी आर्थिक गुंतवणूक करतांना आपली फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच लवकरच पतसंस्थेने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आपल्या स्वमालकीच्या जागेत स्थलांतरित होण्याची अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षा अनुराधाताई आदिक यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली. यावेळी संस्थेचे सहसचिव ड. जयंत चौधरी यांनी आदिक परिवार, आपली मातृसंस्था व आर्थिक संस्था या त्रिवेणी संगमावर विश्वास ठेवून एकसंघ राहण्याचे आवाहन केले. यावेळी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य. हंसराज आदिक, सुनील थोरात सर्व आजी-माजी मुख्याध्यापक आदि मान्यवर उपस्थित होते. पतसंस्थेचे चेअरमन विजय थोरात यांनी सर्वांचे स्वागत करून पतसंस्था कामकाजाचा आढावा दिला अध्यक्ष निवड सुभाष काळे यांनी केली. त्यास संचालक.

बाळासाहेब बनकर यांनी अनुमोदन देऊन सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पतसंस्थेचे व्हा. चेअरमन विलास कुलकर्णी, संचालक संदीप बोरुडे, नवनाथ बर्डे, संगीता घोडे, नंदिनी निर्मळ, रमेश राऊत, सोपान उंडे, मानद सचिव संतोष दांडगे, लिपीक शिवाजी बेरड यांनी प्रयत्न केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक अशोक कटारे, बाळासाहेब वमने व मुदस्सिर सय्यद यांनी केले.

कोयत्याने हल्ला करून ६५ हजार रुपये लुटल्याचा आरोप; तपासासाठी एसपींकडे धाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



टाकळीभान : येथील तन्वीर सलीम शेख (वय २९) यांच्यावर कोयत्याने हल्ला करून ६५ हजार रुपये लुटल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपासात दिरंगाई होत असल्याची तक्रार शेख यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शेख यांच्या तक्रारीनुसार, या प्रकरणात १२ जणांची नावे नमूद करण्यात आली आहेत. संबंधित व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच ११ मे २०२६ रोजी श्रीरामपूर येथील सत्र न्यायालयात जात असताना मुज्जू सादिक सय्यद, जीशान इमाम शेख, तौफिक सत्तर शेख आणि एका अनोळखी व्यक्तीने रस्त्यात अडवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र तक्रार नोंदविण्यात आल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

संबंधित व्यक्तींवर विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचा दावा शेख यांनी केला आहे. तसेच काही व्यक्ती त्यांना आर्थिक पाठबळ देत असल्याचा आणि वक्फ मंडळाच्या जमिनींवर कथित बेकायदेशीर ताबे मिळविण्याच्या प्रयत्नांना मदत करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणाच्या तपासात संबंधित अधिकारी आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप शेख यांनी केला आहे. आरोपींच्या अटकेबाबत विचारणा केली असता अपमानास्पद वागणूक मिळाल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मकोका) कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करावी, तपासातील संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची पडताळणी करावी, तसेच स्वतःसह कुटुंबीयांना संरक्षण देऊन न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी तन्वीर सलीम शेख यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. या प्रकरणातील आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, पोलिसांच्या पुढील तपासातून वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

हिवरगाव पठार-साकूर रस्त्यासाठी साडेतीन कोटींचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते विकासाला चालना मिळणार आहे. हिवरगाव पठार ते साकूर या सुमारे चार किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी (सीआरआयएफ) अंतर्गत तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार अमोल खताळ यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध झाला आहे. अशी माहिती आमदार खताळ यांनी दिली.

हिवरगाव पठार-साकूर रस्त्याच्या सुधारणा कामामुळे परिसरातील दळणवळणाला मदत होणार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत आहे. यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा देखील करत असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

दरम्यान, या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, नागरिकांनी आ.अमोल खताळ यांचे आभार मानले आहेत. तर या निधीच्या मंजुरीबद्दल आमदार अमोल खताळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

नरभक्षक बिबट्या सापडत नसल्याने गोधेगावच्या वाड्या वस्त्यांवर भीती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील गोधेगाव येथील परिसरात सुरेश अहिरे या ५५ वर्षाच्या शेतमजुराला नरभक्षक बिबट्याने फस्त केले होते.मात्र अजून ही नरभक्षक बिबट्याला पकडण्यात वनविभागाला यश आले नाही.यासाठी ड्रोन व सॅटॅलाइट चा वापर करा असा सल्ला अशोकराव ढगे यांनी दिला असून बिबट्या सापडत नसल्याने गोधेगाव परिसरात वाडचावस्त्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे नरभक्षक बिबट्याने एका शेतमजूराचा बळी घेतला ही दुःखद घटना झाल्यानंतर आठवडा झाला तरी अद्यापही बिबट्याला पकडण्यात वनविभागाला यश आले नाही त्यामुळे प्रवरा व गोदावरी काठच्या परिसरात अजूनही भीतीची वातावरण आहे तरी वनविभागाने अधिक प्रयत्नशील राहावे असे आवाहन या परिसरातील नागरिकांसह डॉ अशोकराव ढगे यांनी केले आहे

नरभक्षक बिबट्या पिंजरा जवळ जातो परंतु तो पिंजऱ्यात प्रवेश करत नाही तसेच उसाचे क्षेत्र व लपण्यासाठी खूप जागा असल्यामुळे बिबट्या पकडण्यात अद्यापही यश आले नाही अशी माहिती वनविभाग महाराष्ट्र शासनाचे धुळे साहेब यांनी दिली आहे. या परिसरात गोधेगाव भालगाव वाशिम जर बिबट्या निदर्शनास आला तर तातडीने वनविभागाशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे बिबट्या पकडण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानामध्ये ड्रोन व सॅटॅलाइट चा वापर करणे काळानुसार गरजेचे असून ही यंत्रणा वनविभागाने राबवावी अशी मागणी ही डॉ. ढगे यांनी केली आहे.२

जाहीर निविदा

ग्रामपंचायत वारी ता. कोपरगाव जि अहिल्यानगर

ग्रामपंचायत वारी ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील येथील कामांचे सन २०२५ /२६ साठी नोंदणीकृत ठेकेदार , पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

अ.न.	कामाचे नाव	योजना	अंदाजपत्रके रक्कम	निविदा रक्कम	कामाचा कालावधी	निविदा फी	ठेकेदार
१	मौजे वारी आदिवासी वसाहत सुरेश मोरे वस्ती ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे	पंधरावा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन	तीन लक्ष	२५२२१८	६ महिने	२५०/-	सु बे
२	मौजे वारी (आदिवासी वसाहत ढोलखपूर) ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे	पंधरावा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन	तीन लक्ष	२५२२१८	६ महिने	२५०/-	सु बे
२	मौजे वारी (आदिवासी वसाहत देवी मंदिर)ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे	पंधरावा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन	तीन लक्ष	२५२२१८	६ महिने	२५०/-	सु बे

अटी व शर्ती १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.२४/१०/२०२६ ते ३०/१०/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा ३१/१०/२०२६ रोजी स. ११ वा.उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सरपंच / ग्रामसेवक
वारी ग्रामपंचायत ता. कोपरगाव

भोकर परिसरात ट्रान्सफॉर्मरची चोरी; शेतकरी अंधारात

कर्जुळे वस्तीवरील वीजपुरवठा खंडित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील भोकर परिसरात शेती व वस्तीला वीजपुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर चोरीला गेल्याची घटना गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. खोकर फाटा ते मोठे वाडगाव रस्त्यालगत कर्जुळे वस्ती परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणींत या घटनेमुळे आणखी भर पडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्जुळे वस्ती परिसरातील शेती आणि वस्तीला संबंधित ट्रान्सफॉर्मरद्वारे एकेरी टप्प्यात वीजपुरवठा केला जात होता. बुधवारी मध्यरात्री एक ते तीन वाजेदरम्यान ट्रान्सफॉर्मर चोरीला गेल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मध्यरात्री एकच्या सुमारास अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने सुरुवातीला तांत्रिक बिघाड झाला असावा, असे ग्रामस्थांना वाटले. मात्र, गुरुवारी सकाळी शेतकरी शेतातील विद्युत मोटारी सुरू करण्यासाठी गेले असता वीजपुरवठा बंद असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ट्रान्सफॉर्मरच्या ठिकाणी पाहणी केली असता तो चोरीला गेल्याचे उघड झाले.

ग्रामसुरक्षा दलाची गरज!

ग्रामीण भागातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी गावोगावी ग्रामसुरक्षा दल स्थापन करण्याची मागणी होत आहे. स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देऊन रात्रीच्या गस्तीत सहभागी करणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि पोलिसांशी त्वरित संपर्क साधणे, अशा उपाययोजनांमुळे चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यास मदत होऊ शकते. पोलिस प्रशासनाने ग्रामस्थांशी समन्वय साधून ग्रामीण भागातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. याबाबत श्रीरामपूर तालुका पोलिसांनाही कळविण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. ग्रामीण भागात यापूर्वीही विद्युत मोटारींच्या केबल आणि शेतीसाठी आवश्यक असलेल्या साहित्याच्या चोरीच्या घटना घडल्या आहेत. ट्रान्सफॉर्मर चोरीमुळे संबंधित परिसरातील वीजपुरवठा खंडित होऊन सिंचनाचा प्रश्न निर्माण होतो. पिकांना पाणी देण्याची गरज असताना वीज उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. आधीच पाणीटंचाईशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्यांना अशा घटनांचा अतिरिक्त त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागातील चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, शेतवस्त्या आणि गावाबाहेरील निर्जन ठिकाणांवर लक्ष ठेवावे, तसेच चोरीच्या घटनांचा सखोल तपास करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. महावितरणनेही आवश्यक कार्यवाही करून वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील सुरक्षिततेसाठी पोलिस, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांच्यात समन्वय वाढविण्याची गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल करण कैलास वैष्णव मोबा नं.९५९५३८३८२९ रा. पहाडसिंगपुरा ता. जि. छत्रपती संभाजीनगर व हिरा हनुमंदास वैष्णव रा. लक्ष्मी कॉलनी, सातारा परिसर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहिर नोटीस देण्यात येते की, मौजे प्रवरासंगम, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. १६२/३/२ क्षेत्र ४९.००.०० आर. चौ. मी. ही मिळकत छाया नवनाथ औटी यांच्या मालकीची असून त्यापैकी त्यांनी ३०.००.०० चौ.मी (३० आर) विक्री करावयाची असून सदर क्षेत्राची चर्तुसिमा पुर्वेस :- छत्रपती संभाजीनगर हायवे, दक्षिणेस खरेदी देणार यांचे उर्वरित क्षेत्र, पश्चिमेस लिहुन देणार यांचे उर्वरित क्षेत्र, उत्तरेस गट नं. १६२/२ पैकी अशी चर्तुसिमापुर्वक मिळकत असून सदरची मिळकत ही छाया नवनाथ औटी यांच्या नावावर व त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीत असून आमचे अशिल व त्यांच्यामध्ये जमिनीच्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे सौदा होवून विक्री करण्याचे ठरलेले आहे.

सदर जमिन मालकांनी वरील जमिन निर्वेध व निंजोखमी व निष्कर्जी आहे. तसेच सदर जमिनीचे लीगल टायटल व पझेशन त्यांचे आहे याबाबत त्यांनी आमचे अशिल यांना विश्वास, हमी व भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्तीचा वरील मिळकतीबाबत काही कायदेशीर मालकी कब्जेवहिवाट, तसेच काही अधिकार असल्यास तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचे बक्षिसपत्र, गहाणपत्र, लिन डिड, लिज डीड, साठेखत, शर्तखरेदीखत, मृत्यूपत्र इत्यादी हक्क व अधिकार असल्यास, तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे, सहकारी बँकेचे, सोसायटी अथवा पतसंस्था किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचे तसेच हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वारसा हक्क, पोटगी हक्क, तसेच इतर कोणतेही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत संबंधित इसम अथवा संस्थेने त्याबाबतची सर्व कागदपत्रे व पुराव्यानिशी ८ दिवसाच्या आमच्या कार्यालयात येवुन तशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा कोणत्याही संस्थेचे अगर व्यक्तीची हरकत नाही असे समजुन आमचे अशिल हे वर नमुद मिळकतीचा व्यवहार करुन घेतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची अथवा संस्थेची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही.

ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक :- २३/१०/२०२६

अॅड. डी.आर धिर्डे
बी.ए. एल.एल.बी
नेवासा कोर्ट, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
मोबा नं. ८८३०३३१६४२

नेमलेली ता. १६/१२/२०२६

जाहीर नोटीस अॅड. एम.डी.हारदे
दि.२३.१०.२०२६

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी साहेब वर्ग १ यांचे न्यायालयात इतर फौजदारी चौकशी अर्ज नं. २४७/२०२६

अर्जदार-राजू भाकचंद नरोडे वय ५३, धंदा शेती, रा. गोधेगांव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर मो.नं. ९७६३६११०९०

सामनेवाले-१. ग्रामविकास अधिकारी साहेब ग्रामपंचायत गोधेगांव ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

२. पंचायत समिती नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २४७/२०२६ हा अर्जदार यांनी जन्म / मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदार यांची जन्म दि. ०५/०९/१९७३ अशी असुन त्याच्या जन्माची नोंद होण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत स्वतः किंवा दि. १६/१२/२६ रोजी पर्यंत वकिला मार्फत हजर होवुन हरकती कराव्यात. योग्य मुदतीत कुणीही हरकती या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन अर्जदार यांचा जन्म तारखेचा हक्क सिध्द झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील.

आदेशावरुन
सहा. अधीक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
नेवासा

नेवासा
दि. २३/१०/२०२६ शिक्का

दोन रेल्वेमार्गांना गती; धुळे टर्मिनसच्या घोषणेची प्रतीक्षा कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

धुळे : जिल्ह्यात बोरविहीर–नरडाणा आणि मनमाड–इंदूर या दोन महत्त्वाच्या रेल्वेमार्गांच्या कामांना गती मिळत असताना धुळे रेल्वेस्थानकाला पूर्ण क्षमतेच्या टर्मिनसचा दर्जा कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नवीन रेल्वेमार्गांमुळे जिल्ह्याची रेल्वे जोडणी विस्तारण्याची शक्यता असली, तरी धुळे येथून लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या सुरू करण्यासाठी आवश्यक सुविधांची उभारणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

धुळे रेल्वेस्थानकाचा अमृत भारत योजनेअंतर्गत विकास सुरू आहे. मात्र, स्थानकाचे सौंदर्यीकरण आणि प्रवाशांसाठीच्या सुविधांमध्ये सुधारणा एवढ्यापुरता विकास मर्यादित न ठेवता, देशातील प्रमुख शहरांशी थेट रेल्वे संपर्क साधण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा



उभारण्याची मागणी होत आहे. धुळे रेल्वेस्थानक टर्मिनस व विमानतळ विकास मंचाचे अध्यक्ष गणेश शर्मा यांनी यासाठी अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

टर्मिनससाठी सुविधांचा अभाव

धुळे स्थानकावर सध्या रेल्वेगाड्यांची देखभाल करण्यासाठी आवश्यक पिट लाईन, गाड्या उभ्या ठेवण्यासाठी स्थायी मार्गिका, पुरेशी फलाट क्षमता आणि अन्य तांत्रिक सुविधा उपलब्ध नसल्याने नवीन लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्यावर मर्यादा येत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे यार्डची पुनर्रचना, कोच देखभाल व्यवस्था, सिग्नल यंत्रणा आणि अतिरिक्त फलाटांसह आवश्यक सुविधांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात येत आहे.

दोन मार्गांमुळे अपेक्षा वाढल्या

बोरविहीर–नरडाणा आणि मनमाड–इंदूर हे रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यानंतर धुळे जिल्ह्याची रेल्वे जोडणी अधिक व्यापक होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पांमुळे उद्योग, व्यापार, कृषीमालाची वाहतूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. मात्र, नवीन मार्गांची उभारणी आणि धुळे स्थानकाचा टर्मिनस म्हणून विकास या स्वतंत्र बाबी असून, त्यासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता, तांत्रिक व्यवहार्यता आणि निधीचे नियोजन पूर्ण करावे लागणार आहे.

धुळे येथून पुणे, कोल्हापूर तसेच देशातील अन्य प्रमुख शहरांसाठी थेट रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणीही होत आहे. त्यासाठी रेल्वे प्रशासन आणि रेल्वे मंडळाने आवश्यक सुविधांच्या उभारणीबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दोन रेल्वेमार्गांच्या प्रगतीमुळे धुळे जिल्ह्याच्या रेल्वे विकासाच्या आशा वाढल्या असल्या, तरी टर्मिनसच्या घोषणेची अधिकृत तारीख अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे स्थानकाच्या क्षमतावाढीचा आराखडा, कामांची मुदत आणि थेट रेल्वे सेवांबाबत रेल्वे प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे धुळेकरांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

केळ तलावातील गाळ कधी काढणार? मंत्री निलेश राणेंचा अधिकाऱ्यांना जाब !

तलावातील गाळ काढल्यास त्याची पाणीसाठवण क्षमता वाढविण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या कामाबाबत प्रशासनाने ठोस नियोजन करून पुढील कार्यवाही स्पष्ट करणे गरजेचे आहे. मच्छीमारांना तातडीने मदत मिळण्याबरोबरच तलावातील गाळ काढण्याच्या प्रश्नावरही निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे आता प्रशासन याबाबत कोणती पावले उचलते आणि मच्छीमारांना दिलासा देण्यासाठी काय उपाययोजना करते, याकडे चिचोंडी पाटीलमधील ग्रामस्थ आणि मच्छीमारांचे लक्ष लागले आहे.

रामदास कदमांनी महायुतीत मिठाचा खडा टाकू नये!

आहे का, हेही स्पष्ट व्हायला हवे, असे आव्हान त्यांनी दिले.दुष्काळी परिस्थितीत मत्स्यव्यवसायातील अडचणी आणि मच्छीमारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी राणे अहिल्यानगरमध्ये आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आमदार काशिनाथ दाते आणि भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते उपस्थित होते. राणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जोडी राम-लक्ष्मणासारखी आहे. या जोडीने महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरे यांच्या राजकारणाला धक्का दिला. भाजपने साथ दिल्यामुळेच एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री होता आले. त्यामुळे भाजप शिवसेनेला संपवायला निघाली असल्याची रामदास कदम यांची टीका निराधार आहे. अशा विधानांमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण होत आहे. मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करीत असल्याचे सांगत राणे यांनी त्यांचे कौतुक केले. कथित ध्वनिफितीची चौकशी सुरू असून, अहवाल आल्यानंतर सत्य समोर येईल. मात्र, ही ध्वनिफीत बनावट निघाली तर काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. 'देवाभाऊंच्या राज्यात सर्व सुरक्षित' मुंबईतील गोळीबार आणि चित्रपट अभिनेत्यांना मिळणाऱ्या धमयांबाबत बोलताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्व सुरक्षित असल्याचा दावा राणे यांनी केला.

फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर गोळीबार; नंतर स्वत:लाच संपवले!

यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान मृत तरुणाची ओळख योगेश डोंगरे अशी पटली. त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. या घटनेप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. महिलेवरील गोळीबाराचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, तोफखाना पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

प्राणी-पक्ष्यांना पाणी, पुण्याईची कहाणी

प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : ऑक्टोबरमधील वाढत्या उन्हामुळे प्राणी-पक्ष्यांना पाण्याची टंचाई जाणवत असताना, त्यांची तहान भागविण्यासाठी प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशनच्या वतीने 'प्राणी-पक्ष्यांना पाणी, पुण्याईची कहाणी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मागील वर्षी सुरू झालेल्या या उपक्रमातून मुक्या जीवांच्या संवर्धनाचा संदेश दिला जात असून, यंदाही नागरिक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग मिळत आहे. उपक्रमांतर्गत वापरात नसलेल्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा पुनर्वापर करून त्यामध्ये पाणी भरून पक्ष्यांसाठी झाडांवर टांगण्यात आले आहे. तसेच भटक्या प्राण्यांची तहान भागविण्यासाठी लोकसहभागातून विविध ठिकाणी सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत. या टाक्यांची नियमित स्वच्छता आणि पाणी भरण्याची जबाबदारी घेणाऱ्या नागरिकांच्या घरासमोर त्या ठेवण्यात येत आहेत. दसऱ्याच्या मुहूर्तावर इंदिरानगर येथे गोरडे यांच्या गोठ्यासमोरही पाण्याच्या टाक्या ठेवण्यात आल्या. या उपक्रमात शरद कोतकर, शिवाजी कलगुंडे, सिताराम कुऱ्हे, राजेश चुडीवाल, चंद्रकांत घाडगे, किशोर शिंदे, डॉ. हरीश बेनके, साधना साळुंके, अनिकेत वराडे, विद्या वराडे यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले आहेत. उन्हाळ्यातच नव्हे, तर वर्षभर प्राणी-पक्ष्यांना स्वच्छ पाण्याची गरज असते. त्यामुळे नागरिकांनी घरासमोर किंवा परिसरात पाण्याची व्यवस्था करावी. तसेच वाया जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करण्यासाठी गळती किंवा ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली सिमेंटच्या टाक्या ठेवून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा पल्लवी संजय आल्हाट यांनी केले आहे.

चणेगाव सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी प्रा. गणेश खेमनर, तर उपाध्यक्षपदी नारायण ढमक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आष्टी : शिर्डी विधानसभा मतदारसंघातील राजकीय व सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या चणेगाव (ता. संगमनेर) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी प्रा. गणेश खेमनर यांची, तर व्हाइस चेअरमनपदी नारायण ढमक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल गावासह पंचक्रोशीतील नागरिकांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे. शैक्षणिक क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेले आणि विखे पाटील परिवाराचे समर्थक म्हणून परिचित असलेले प्रा. खेमनर यांच्यावर आता सहकार क्षेत्राची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे, सभासदांना पीककर्ज उपलब्ध करून देणे, संस्थेचा कारभार पारदर्शक ठेवणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ सभासदांपर्यंत पोहोचविणे यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

वाडगाव फाट्यावर काळाचा घाला! ट्रॅक्टरच्या धडकेत अंगणवाडी सेविकेचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



गंगापूर : मामाच्या गावाहून घरी परतत असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात ट्रॅक्टरने इलेक्ट्रिक स्कुटीला जोरदार धडक दिल्याने अंगणवाडी सेविकेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजेच्या सुमारास गंगापूर–वैजापूर रस्त्यावरील वाडगाव फाट्याजवळ घडली. अंजली कैलास तूपलोंढे (वय २६, रा. जामगाव, ता. गंगापूर) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे जामगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंजली तूपलोंढे या वैजापूर तालुक्यातील शिवराई येथे मामाला भेटण्यासाठी गेल्या होत्या. तेथून इलेक्ट्रिक स्कुटीवरून जामगाव येथे घरी परतत असताना वाडगाव फाट्याजवळ पाठीमागून आलेल्या अज्ञात ट्रॅक्टरने त्यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या.अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक शुभम वाघमारे, लकी शहा आणि चेतन पंडित यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी अंजली यांना उपचारासाठी गंगापूर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, या अपघातप्रकरणी अज्ञात ट्रॅक्टरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय पाखरे करीत आहेत.

अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहूरी : काल शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणी योजनेची ११०० एम.एम व्यासाची मुख्य जलवाहिनी नांदगाव शिवारात रभाई ओढ्यामध्ये चडपुउड मार्फत सोलर बसविणेचे कामा दरम्यान ड्रीलडरे खोदकाम करताना फुटली असल्याने लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाया जात असल्याचे चित्र दिसत होते. एकीकडे पावसाने दडी दिल्याने दुष्काळाच्या झळा उंबरठ्यावर असतानाच नांदगाव शिवारात अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनी फुटल्याने सदरील ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याने सदरहू जलवाहिनीडरे मुळानगर येथून होणारा पाणी उपसा त्वरित बंद करून तातडीने जलवाहिनी दुरूस्तीचे काम हाती अहिल्यानगर महापालिकेने हाती घेतले आहे. एकीकडे पाहण्यासाठी जनता भटकंती करीत असून पिण्याच्या पाण्याचे सुद्धा अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत.

सोनोग्राफी मशीन चालवण्यासाठी तज्ञ ऑपरेटरची नियुक्ती करा : मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : येथील उपजिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन धूळखात पडून असल्याने रुग्णांना तपासणीसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही सुविधा तातडीने सुरू करून सोनोग्राफी मशीन चालविण्यासाठी आवश्यक पात्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)च्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाचे शहराध्यक्ष बापू खाजेकर यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ.मुंडे यांना बुधवारी (दि.२१) निवेदन दिले. गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात परिसरातील अनेक नागरिक, गरोदर माता आणि इतर रुग्ण उपचारासाठी येतात. आजारांचे योग्य निदान करण्यासाठी सोनोग्राफी तपासणी महत्त्वाची असते. मात्र, आवश्यक पात्र मनुष्यबळाअभावी ही सुविधा उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे गरीब व गरजू रुग्णांवर आर्थिक भार पडतो, तसेच वेळेवर तपासणी न झाल्यास उपचारास विलंब होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमांनुसार आवश्यक पात्र व अधिकृत तंत्रज्ञ किंवा संबंधित वैद्यकीय तज्ज्ञाची तातडीने नियुक्ती अथवा उपलब्धता करून द्यावी. तसेच मशीन उपलब्ध असूनही मनुष्यबळाअभावी सोनोग्राफी तपासणी बंद असल्यास त्याची कारणे तपासून रुग्णांना नियमितपणे ही सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



निधनवार्ता

इंदुमती तिय्या



शिर्डी : येथील रहिवासी इंदुमती जयानंद तिय्या (वय ८४) यांचे नुकतेच गणेशपुरी येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.त्या अतिशय मनमिळावू, प्रेमळ आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिर्डी येथील साईभक्त व उद्योजक योगेश तिय्या व भरत तिय्या तसेच योगीता शहा यांच्या त्या मातोश्री होत्या.

अमित नढे



निघोज : रांधे येथील अमित वसंतराव नढे (वय ४१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, भाउ असा परिवार आहे. रांधे येथील सामाजिक कार्यकर्ते वसंतराव नढे यांचे ते चिरंजीव होत. तसेच अळकुटी येथील स्वामीनी हॉटेलचे मालक जयेश नढे यांचे ते बंधू होत. निघोज येथील डी बी लाळगे कंट्रक्शन कंपनीचे मालक दत्तात्रय लाळगे यांचे ते जावई तसेच डी बी लाळगे कंट्रक्शन कंपनीचे संचालक सागरशेठ लाळगे तसेच निघोज येथील पेट्रोल पंपाचे मालक राजेंद्र लाळगे यांचे ते मेहुणे होत.

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या वैजापूर शाखेची झडती; ४९ खातेदारांचे सोने ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे वैजापूर शहरासह ग्रामीण भागातील अनेक खातेदारांचे कोट्यवधी रुपये अडकले असताना शुक्रवारी (दि. २३) बीड येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या पथकाने वैजापूर शाखेची झडती घेतली. या कारवाईत शाखेतील महत्त्वाचे दस्तावेज ताब्यात घेण्यात आले असून, ४९ खातेदारांचे सोनेही पथकाने ताब्यात घेतल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांनी दिली. या कारवाईमुळे ठेवीदारांमध्ये पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे.

शुक्रवारी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास बीड येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक वैजापूर शहरातील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या शाखेत दाखल झाले. पथकाने शाखेतील कागदपत्रांची तपासणी केली. संबंधित जागेचा पंचनामा करून काही महत्त्वाचे दस्तावेज ताब्यात घेतले. या कारवाईमुळे शाखेतील आर्थिक व्यवहार आणि खातेदारांच्या मालमत्तांशी संबंधित नोंदींची तपासणी होण्याची शक्यता आहे.ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये सोने गहाण ठेवून कर्ज घेतलेल्या खातेदारांचे सोने पथकाने ताब्यात घेतले आहे. संबंधित खातेदारांनी बीड येथे जाऊन आवश्यक



प्रक्रिया पूर्ण करून आपले सोने सोडवून न्यावे, असे जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांनी सांगितले.

दरम्यान, शाखेत पथक आल्याची माहिती मिळताच खातेदारांनी मोठी गर्दी केली. अनेकांनी आपल्या ठेवींची सद्यस्थिती आणि पैसे परत मिळण्याबाबत विचारणा केली. मात्र, शाखेच्या झडतीमुळे ठेवीदारांच्या रकमा नेमक्या कधी आणि कशा परत मिळणार, याचे उत्तर अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे सोने ताब्यात घेण्याच्या कारवाईनंतर आता ठेवीदारांच्या पैशांच्या परताव्याबाबत प्रशासन कोणती पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वैजापूर शहरात चोरट्यांचा धुमाकूळ

दुकाने फोडून रोकड लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : शहरात चोरट्याने रात्रभर धुमाकूळ घालत व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. गुरुवारी मध्यरात्रीपासून शुक्रवारी सकाळपर्यंत मुरारी पार्क परिसरातील चार दुकाने फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. यातील एका मोबाईल दुकानातून सहा ते सात हजार रुपये, तर लाडगाव रोडवरील किराणा दुकानातून दहा हजार रुपयांची रोकड चोरट्याने लंपास केली. शहरातील अन्य सहा ते सात ठिकाणीही चोरीचे प्रयत्न झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, या घटनांचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असतानाही अनेक पीडितांनीतक्रार दिलेली नाही.गुरुवारी रात्री सुमारेदोन वाजता चोरट्याने मुरारी पार्क परिसराला लक्ष्य केले. येथील श्री नारायणगिरी ऑरगॅनिक ॲग्रो, किसान ॲग्रो एजन्सी आणि खांबेकर इलेक्ट्रॉनिक्स या दुकानांचे शटर उचकावून चोरीचा प्रयत्न केला. याच परिसरातील सीएसएम टेक सोल्युशन या मोबाईल दुकानाचे शटर उचकावून लॉक तोडण्यात आले. दुकानाच्या गल्ल्यातील सहा ते सात हजार रुपयांची रोकड चोरट्याने लंपास केली.त्यानंतर शुक्रवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास लाडगाव रोडवरील महेश किराणा दुकानाचे लॉक तोडून शटर उचकावण्यात आले. दुकानातील दहा हजार रुपयांची रोकड चोरीला गेली. एकाच रात्री अनेक दुकाने लक्ष्य करण्यात आल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहेदरम्यान, शुक्रवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास गोदावरी कॉलनी आणि आदर्श कॉलनी परिसरात झाडलोट करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोने दुचाकीवरून आलेल्या व्यक्तीने हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न फसला आणि महिलेचे सोने सुरक्षित राहिले.या घटनांचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असल्याने चोरट्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. मुरारी पार्क परिसरातील चोरीप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, अन्य घटनांतील पीडितांनी अद्याप पोलिसांत तक्रार दिलेली नाही.

नावात बदल

मी तवले प्रवीण नंदकुमार राहणार वाघवाडी, लोहगाव, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर सत्यप्रतिनज्ञेवर कथन करतो की,माझे शाळा सोडल्याचा दाखल्या वरील नाव **तवले प्रविण नंदु** असे असुन आधार कार्ड आणि पॅन कार्ड वरील नाव **तवले प्रविण नंदकुमार** असे आहे परंतु दोन्ही नावाची व्यक्ती ही एकच असून ती मीच आहे
आधार नं – ३०१२९०२३००७६

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME PATEL RIZWANA ISMAEEL (BEFORE NAME) (AFTER MARRIAGE) TO NEW NAME AS RIJVANA NAIM SHAIKH (AADHAAR NO.- 7842-7707-1455) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON
PLACE : KOPARGAON
DATE : 23/10/2026

CHANGE OF NAME --

I Have changed my old name PREMA RAM ISHWAR RAM. My new name is PEMARAM ISHWARRAM. Both names are same person and person is same not any other person.
AFF No-
265224204126810072893S.
Date 23/10/2026.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME KALIM ABDUL RAHMAN SHAIKH (OLD PASSPORT NO.J3882890) & SHAIKH KALIMODDON SHAIKH A RAHEMAN (LEAVING CERTIFICATE) TO MY NEW NAMS AS KALIM ABDUL RAHEMAN SHAIKH (ADHAR NO.8527 6002 1776) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC, SHRIRAMPUR
DATE:- 22/10/2026
PALCE:- SHRIRAMPUR

आजची युवती राष्ट्रनिर्मितीची भागीदार : वर्मा

धुळ्यात अभावीपचे अग्निशिखा युवती संमेलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

धुळे : विकसित भारताचे स्वप्न युवतींच्या सहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आजची युवती केवळ लाभार्थी नसून, राष्ट्रनिर्मितीची भागीदार आहे. शिक्षण, तंत्रज्ञान आणि नेतृत्व या तीन क्षेत्रांत युवतींनी आघाडी घेतली तर भारत जगाचे नेतृत्व करेल, असे अभाविपच्या केंद्रीय कार्यसमितीच्या सदस्या शालिनी वर्मा यांनी सांगितले. शहरातील जिजामाता कन्या विद्यालयात अभाविपतर्फे 'अग्निशिखा युवती संमेलन' घेण्यात आले. यावेळी शालिनी वर्मा बोलत होत्या. उद्घाटन उपशिक्षणाधिकारी प्रतिभा ठाकूर, डॉ. कीर्ती ठाकूर, प्राचार्या अपर्णा पाटील, संमेलन प्रमुख अनन्या याज्ञिक यांच्या उपस्थितीत झाले. उपशिक्षणाधिकारी ठाकूर यांनी संवाद साधला. द्वितीय सत्रात डॉ. उज्ज्वला घुमरे यांनी आरोग्य, भविता देवरे यांनी महिला उद्योजकांसाठी असलेल्या संधी, गायत्री चव्हाण यांनी सोशल मीडियाचा वापर करिअरसाठी कसा करावा यावर संवाद साधला. प्रास्ताविक स्वागत समितीच्या अध्यक्षा प्राचार्या अपर्णा पाटील, तर आभार अनन्या याज्ञिक यांनी मानले. धुळे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ३०० विद्यार्थिनी या संमेलनात उपस्थित होत्या. अनन्या याज्ञिक, अनन्या राऊतमारे, भक्ती अहिरे, कोमल कुलकर्णी, कार्तिकी ठाकूर, कृपा करंकाळ, हेमानी पाटील, साक्षी शिरसाठ, लहानू कोळेकर, मनीष भोसले यांनी सहकार्य केले.

> आजूबाजूच्या वेगवेगळ्या घटना पाहता मुलींना समाजात वावरणे कठीण झाले आहे. या संमेलनातून बाहेरील जगात कसे वागायचे? सोशल मीडियाचा वापर कसा करावा? याविषयी शिकायला मिळाले.
>
> **– गायत्री देसले, विद्यार्थिनी, धुळे**

> शिक्षण युवतींच्या सक्षमीकरणाचे सर्वात मोठे हत्यार आहे. एनईपी २०२० ने मुलींसाठी शिक्षणाचे नवे दालन उघडले आहे. विकसित भारत घडवण्यासाठी प्रत्येक युवतीने आत्मनिर्भर व्हावे.
>
> **प्रतिभा ठाकूर, उपशिक्षणाधिकारी, धुळे**

जाहिर नोटीस

सोलापूर येथिल मे. मोटार अपघात दावे न्यायाधिकरण यांचे कोर्टात मा.श्री. डी.एन. सुरवसे साहेब DJ-3 यांचे कोर्टात

एम.ए.सी.पी. नं.१५२/२०२५
निशाण नं.

अर्जदार
नैजोद्दीन हरुन शेख वगैरे
विरुध्द-
बाळासाहेब लक्ष्मण गावडे वगैरे – सामनेवाला

प्रति,
बाळासाहेब लक्ष्मण गावड
रा. मोहोडी, ता.जि.धुळे

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा अरबाज नैजोद्दीन शेख हा अनगर ते यावली रोड वरील बिटले फाटा येथे दि.११/१०/२०२२ रोजी तुमचे कार नं.एम.एच.१८/बी.जी.०४०५ याने मोटार अपघात होवून त्यात मयत झालेले आहेत. त्यामुळे अर्जदारानी आपले विरुध्द मोटार अपघात नुकसान भरपाईचा दावा मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी आपणास या नोटीशीद्वारे कळविणेत येते की, सदर दाव्यामध्ये आपले म्हणणे दाखल करण्यासाठी मे. कोर्टाने ठरवलेली तारिख१९/११/२०२६ रोजी आपण स्वतः अगर आपल्या वकिलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे अन्यथा आपलेविरुध्द एकतर्फा निकाल झाल्यास आपण स्वतः जबाबदार असाल. ही जाहीर नोटीस दिली. दि.२२/१०/२०२६

हुकमावरुन
सही/-
लिपीक — शिक्का — सही/-
न्यायालयीन अधिक्षक

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त: १-९
सिंगल ५-१-९ मजबुत
१३७ १२८ १००
१२६ १८० २७०
१२-६९-०३-८५-९७

कल्याण
उदय-अस्त: २-५
सिंगल ९-४-५ मजबुत
१४७ २०० ११०
१४० १५९ ११३
२९-१५-३४-७६-५८

मुंबैम (मेन)
उदय-अस्त: सुट्टी
सिंगल ४-७-९ मजबुत
जोड- सुट्टी

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	259 60 550	590 42 228	358 62 390	400 47 890	160 70 488
03/08/2026 to 07/08/2026	234 90 569	170 85 159	338 42 129	460 09 478	370 05 348
10/08/2026 to 14/08/2026	577 99 234	230 53 148	250 70 235	355 39 135	133 76 358
17/08/2026 to 21/08/2026	240 60 460	278 73 346	116 82 480	156 23 779	449 77 179
24/08/2026 to 28/08/2026	360 96 790	255 23 229	789 42 237	450 98 440	266 41 290
31/08/2026 to 04/09/2026	149 43 670	170 81 560	159 52 336	690 50 235	577 99 135
07/09/2026 to 11/09/2026	680 47 557	228 27 124	570 26 358	112 43 779	445 33 689
14/09/2026 to 18/09/2026	789 47 124	336 20 136	799 56 178	680 42 345	999 16 790
21/09/2026 to 25/09/2026	390 25 348	457 62 129	480 23 599	166 30 479	150 60 280
28/09/2026 to 02/10/2026	669 19 135	137 18 279	260 84 257	660 29 126	369 84 770
05/10/2026 to 09/10/2026	140 57 250	459 85 168	130 48 567	469 99 126	558 84 590
12/10/2026 to 16/10/2026	160 79 568	290 11 669	122 58 189	130 46 123	257 42 480

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
३३०	४६०
६८	०७
११६	२७८

वन्यजीवांसाठी घोटभर पाण्याची गरज

परिसरातील पाणवठे कोरडे ठाक....

संतोष सोबले । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : गेल्या चार पाच महिन्यापासून पाऊस लांबणीवर गेला आहे तसेच उन्हाचा वाढता तडाखा, घटते जलस्रोत आणि जंगल परिसरातील पाण्याची कमतरता यामुळे वन्यजीवांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. पाण्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वस्त्यांकडे धाव घेत असल्याने त्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत वन्यजीवांसाठी घोटभर पाणी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे.

पारनेर तालुक्यातील वन विभागाच्या परिसरात आणि ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या दिवसांत तीव्र पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे.पाऊस नसल्याने नैसर्गिक ओढे, नाले, तलाव तसेच लहान जलस्रोत कोरडे पडल्याने पक्षी, ससे, कोल्हे, मोर आणि इतर वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकावे लागते. अनेकदा पाण्याच्या शोधात हे प्राणी शेतशिवारात, रस्त्यांवर किंवा गावांच्या आसपास येतात. त्यामुळे अपघात होण्याची तसेच मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याची भीती असते.या पार्श्वभूमीवर वन्यजीवांसाठी शेतशिवारात, जंगलालगतच्या सुरक्षित ठिकाणी आणि पक्ष्यांची वर्दळ असलेल्या परिसरात पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात मातीची किंवा सिमेंटची भांडी ठेवून त्यामध्ये स्वच्छ पाणी भरावे. मात्र, पाण्याची भांडी रस्त्याच्या कडेला किंवा वाहनांची वर्दळ असलेल्या ठिकाणी न ठेवता सुरक्षित जागी ठेवावीत. पाण्याची भांडी नियमित स्वच्छ करून त्यातील पाणी बदलणेही महत्त्वाचे आहे.

> सामाजिक संघटनां आणि निसर्गप्रेमी यांनी पुढाकर घेऊन परिसरातील पाणवठे भरून काढण्याची आवश्यकता आहे. तसेच वनविभागाने प्रशासकीय यंत्रणेद्वारे वन्यजीवांचा पाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे.
> **विनोद गोळे**



पक्षी आणि लहान वन्यजीवांसाठी झाडांच्या सावलीत पाणी ठेवल्यास त्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. तसेच पाणवठ्यांमध्ये प्लास्टिक किंवा इतर कचरा टाकू नये. पाण्याची व्यवस्था करताना वन्यप्राण्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे.वन्यजीव हे निसर्गसाखळीचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. उन्हाळ्यात तहानलेल्या जीवांसाठी घोटभर पाणी उपलब्ध करून देण्याचा छोटासा प्रयत्नही अनेक जीवांचे प्राण वाचवू शकतो. त्यामुळे पारनेर तालुक्यातील नागरिक, शेतकरी, युवक मंडळे आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन निसर्गप्रेमींकडून करण्यात येत आहे.

द•ख•ल

जवळ्यातील खाकसार वलीबाबांच्या उरुसास शनिवारी प्रारंभ

जामखेड : जामखेड तालुक्यातील जवळा येथील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या सय्यद नूर खाकसार वलीबाबा यांच्या ४४ व्या ऊरूसास शनिवारपासून (ता.२४) प्रारंभ होत आहे. स्वर्गीय सय्यद बु-हाणहबीब शाह यांच्या प्रेरणेने होत असलेला हा उरूस तीन दिवस साजरा होत आहे. शनिवारी (ता.२४) पहिल्या दिवशी गुसूल कुराण खानी मिलाद हा कार्यक्रम आहे. यादिवशी कुराणाचे पठण करतानाच, खाकसार वलीबाबा यांची कबर व दर्गा शुध्द पाण्याने धुवून गुलाबपाणी व अत्तराने कबर स्वच्छ करून पूजा करून, मानाचा गळ्हब कबरेवर चढवला जातो, रविवारी (ता.२५) उरुसाचा मुख्य दिवस संदल कार्यक्रम आहे. दर्ग्याचे प्रतीक तयार करून, या दिवशी जवळा गावातून सवाद्य संदल मिरवणूक काढण्यात येते. संदल मिरवणुकीत गावातील, तसेच बाहेर गावाहून आलेले सर्व जातीधर्माचे भाविक मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. संदल मिरवणुकीनंतर दर्ग्याचे मुजावर कबरीची पूजा करून, फुलांची चादर कबरीवर चढविली जाते. यावेळी भाविकांना प्रसाद दिला जातो. यानंतर मुंबईचे प्रसिध्द कव्वाल गायक नईम हाशिम चिस्ती यांचा कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. तिसऱ्या दिवशी सोमवारी (ता.२६) सर्व मुस्लिम बांधव, तसेच अन्य धर्मीय लोक इच्छेनुसार फुलांची चादर चढवतानाच, नेवेद्य दाखवतात.यावेळी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

आनंद तीर्थाचे काम लवकरच पूर्ण होणार : पितळे

अहिल्यानगर : पासून अवघ्या तीस किमी अंतरावर राष्ट्र संत परमपूज्य आनंद ऋषीजी महाराज यांच्या जन्मगावी विविध मंदिर, प्रशासकीय इमारत, भक्तनिवास, भोजनालय अश्या विविध इमारतींची कामे चिचोंडी शिराळ येथे मागील दहा वर्षापासून चालू आहेत. आपल्या शहरापासून जवळच सुबक, आकर्षक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चालू असलेल्या कामांना संस्थेच्या वतीने भेट देण्याचे नियोजन ट्रस्टची परवानगी घेऊन करण्यात आले. संस्थेच्या जवळपास ७० आर्किटेक्ट इंजिनीअर्स आणि त्यांचे कुटुंबीय यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. या परिसरात शमोशरण तीर्थ, नावकार कलश तीर्थ, गुरु चरण तीर्थ अश्या जैन समाजाच्या दृष्टीने पवित्र मंदिरांचे स्थापत्य कलेच्या दृष्टीने आताच्या काळातील सर्वोत्कृष्ट बांधकामे उभारण्याचे काम चालू आहे. संस्थेच्या सभासदांनी पाँडिचेरी येथील २०१० साली मातृ मंदिराच्या धर्तीवर उभारण्यात आलेले लोटस टेम्पलला स्टडीटूर द्वारे भेट दिली होती. याच धर्तीवर साकारण्यात येत असणारे गुरू चरण तीर्थ हे या अभ्यास दौऱ्याचे मुख्य आकर्षण होते. भारतातील सुप्रसिध्द आर्की. देवेंद्र सोमपूरा यांनी गुरू चरण तीर्थ या मुख्य मंदिराचे प्लॅनिंग केले आहे. जवळपास ३०,००० चौ फूट क्षेत्राचा बिल्ट अप, मधील केंद्रस्थानी ८० फूट उंच. स्टील ऐवजी एफ आर पी बार चा वापर आणि ८० एम पी ए ताकदीचे कॉंक्रिट, ग्रीड स्लॅब , प्रचंड पाकळ्यासाठी वापरलेले फेरो सिमेंट सारखे तंत्रज्ञान, तसेच नैसर्गिक ए सी कुलर सिस्टीमसाठी कौलारू प्लेट मधून पाणी आणि हवा वाहून जाण्यासाठी केलेली योजना. अश्या विविध छटा या इमारतीमध्ये दिसून आल्या. एंट्री जवळील एसा संस्थेचे आर्की. प्रितेश गुगळे यांनी प्लॅनिंग केलेले आणि इंजि. शाम गुलाटी इंजि. धनेश मुनोत यांनी साकारलेली प्रशासकीय इमारत तसेच तेथील ऑडियोटोरियम हॉल लक्ष वेधून जातो.

सुमय्या शेख ठरली वर्षातील सर्वोत्तम खेळाडू

अहिल्यानगर : येथील प्रतिभावान महिला फुटबॉलपटू सुमय्या शेख हिने आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेच्या वतीने दिला जाणारा २०२५-२६ हंगामातील वरिष्ठ महिला गटाचा 'वर्षातील सर्वोत्तम खेळाडू' पुरस्कार पटकावला आहे. मुंबई



येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. सुमय्याने संपूर्ण हंगामात राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केली. तिच्या खेळातील कौशल्य, गोल करण्याची क्षमता आणि संघाच्या यशात दिलेले योगदान यांची दखल घेत तिला या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२५-२६ च्या हंगामात सुमय्याने लोणावळा येथे झालेल्या महाराष्ट्र वरिष्ठ क्लब राज्य लीग स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या क्रीडा प्रबोधिनी संघाचे प्रतिनिधित्व केले. केरळ येथे झालेल्या इंडियन वुमेन्स लीग २ स्पर्धेत तसेच बंगळुरू येथे झालेल्या खथङ २ अंतिम फेरीतही तिने सहभाग नोंदविला. जळगाव येथे झालेल्या आंतरजिल्हा स्पर्धेत अहिल्यानगर संघाने तृतीय स्थान मिळविले, तर सुमय्याने या स्पर्धेत सर्वाधिक गोल करून स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरण्याचा मान मिळविला. आंतरविद्यापीठीय फुटबॉल स्पर्धांमध्येही तिने आपल्या कामगिरीची छाप पाडली. मध्य प्रदेश येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात तिचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यानंतर तामिळनाडू येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने उपविजेतेपद पटकावले. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतही सुमय्या सर्वाधिक गोल करणारी खेळाडू ठरली. राज्यस्तरीय लीगपासून ते राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांपर्यंत सातत्यपूर्ण कामगिरी, दोन महत्त्वाच्या स्पर्धांमधील सर्वोच्च गोलसंख्येचा बहुमान आणि संघाच्या यशात दिलेले योगदान या कामगिरीमुळे सुमय्याने वरिष्ठ महिला फुटबॉलमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. क्रीडा प्रबोधिनी पुणे संघात समावेश होण्यापूर्वी सुमय्या हिचे प्रशिक्षण गुलमोहर फुटबॉल क्लब अहिल्यानगर येथे झाले असून, तिच्या यशामध्ये गुलमोहर फुटबॉल क्लब चे मोठे योगदान आहे.

वृक्षतोड रोखूया, निसर्गाचे रक्षण करूया!

वृक्षतोडीची माहिती देणाऱ्याला एक हजार रुपयांचे बक्षीस

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : वाढते तापमान, बदलते हवामान आणि दिवसेंदिवस कमी होत चाललेले हरित क्षेत्र यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असताना वृक्षसंवर्धनाची गरज अधिक तीव्रतेने जाणवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर वृक्षतोड रोखून निसर्गाचे रक्षण करण्यासाठी वृक्षमित्र उमेश भाऊ भालसिंग यांनी पुढाकार घेतला असून, अवैध वृक्षतोडीची माहिती देणाऱ्या व्यक्तीला एक हजार रुपयांचे बक्षीस देण्याचा उपक्रम जाहीर केला आहे. वृक्ष वाचविणे ही केवळ एका व्यक्तीची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.



वृक्ष हे निसर्गाचे अनमोल धन असून मानवी जीवनासाठी ऑक्सिजन, सावली, शुद्ध हवा आणि पावसाचे संतुलन राखण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, विकासाच्या नावाखाली किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी अनेक ठिकाणी झाडांची कत्तल केली जात असल्याने पर्यावरणासमोर गंभीर आव्हान उभे राहिले आहे. वृक्षतोडीमुळे तापमानात वाढ, जमिनीची धूप, पर्जन्यमानातील अनियमितता आणि जैवविविधतेचे नुकसान यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृक्षतोड रोखण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहून पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

> एक झाड वाचविणे म्हणजे भविष्यातील अनेक जीवांचे रक्षण करणे' ही भावना प्रत्येक नागरिकाने मनात रुजविण्याची गरज आहे. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन करणे आणि अस्तित्वातील वृक्षांचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निसर्गाचे रक्षण हीच खऱ्या अर्थाने भावी पिढ्यांना दिलेली अमूल्य भेट ठरेल.

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर वृक्षसंवर्धनाचा संकल्प करून हिरवेगार भविष्य घडविण्याचे आवाहन उमेश भालसिंग यांनी केले आहे. आपल्या परिसरात बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी त्याची योग्य माहिती संबंधित यंत्रणेला द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

वृक्षतोडीची माहिती देणाऱ्या व्यक्तीला एक हजार रुपयांचे बक्षीस देण्याच्या घोषणेमुळे पर्यावरण रक्षणाच्या कार्याला लोकसहभागाची जोड मिळण्याचा आशावाद निर्माण झाला आहे.

नेवासा ते अक्कलकोट' नवीन बस फेरी सुरू!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगाव : शेवगांव तालुक्यातील ढोरजळगाव व परिसरातील ग्रामस्थांची अनेक दिवसांची प्रलंबित मागणी अखेर पूर्ण झाली आहे. माजी सरपंच सुवर्णा देविदास गि-हे यांनी ग्रामस्थांच्या मागणींची दखल घेत केलेल्या यशस्वी पाठपुरावामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नेवासा ते अक्कलकोट ही नवीन थेट बस फेरी सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.

येत्या शनिवारी २४ ऑक्टोबर २०२६ पासून ही बस सेवा प्रवाशांच्या सेवेत नियमित धावणार आहे. शाळा व्यवस्थापनाशी संपर्क आणि मुंबई पातळीवर पाठपुरावा या मार्गावरून शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना येण्या-जाण्यासाठी कोणतीही हक्काची वाहतूक सुविधा उपलब्ध नव्हती. ही गंभीर बाब लक्षात घेऊन सुवर्णा गि-हे यांनी स्वतः स्थानिक शाळांमधील व्यवस्थापन व प्रशासनाशी संपर्क साधला. विद्यार्थ्यांच्या प्रवासाची मोठी कोंडी होत असून, आपण सर्वांनी एकत्र येऊन आगार प्रशासनाकडे मागणी केली पाहिजे, अशी विनंती त्यांनी शाळा व्यवस्थापनाला केली होती. त्यानंतर त्यांनी ०५ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई मध्यवर्ती कार्यालय, विभागीय कार्यालय तसेच आगार प्रशासनाकडे सातत्यांने पाठपुरावा केला, ज्याला आता मोठे यश आले आहे. यापूर्वी अहिल्यानगर-पैठण बससाठी स्वतः रस्त्यावर उतरून केले होते सर्वेक्षणः माजी सरपंच सुवर्णा गि-हे यांचा प्रवाशांच्या सोयीसाठीचा हा पहिलाच तगादा नाही.

श्री साई ग्रामीण पतसंस्थेच्या भोसरी शाखेचे थाटात उद्घाटन



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : तालुक्यातील अग्रगण्य सहकारी पतसंस्थांपैकी एक असलेल्या श्री साई ग्रामीण पतसंस्थेच्या पुणे जिल्ह्यातील भोसरी येथील १६ व्या शाखेचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला. ग्रामीण भागात भरीव कामगिरी करत आता शहरी भागातही विश्वासार्हतेचा ठसा उमटविणाऱ्या संस्थेच्या या विस्ताराचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी आमदार महेशदादा लांडगे यांनी श्री साई ग्रामीण पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले. ग्रामीण भागात उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेने शहरी भागातही पदार्पण केले असून, लोकांचा विश्वास संपादन करणे ही संस्थेच्या कार्याची मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला श्री. त्र्यंबकदादा कोरडे, नगरसेवक सागरभैय्या गवळी, नितीनशेठ लांडगे, जालिंदर शिंदे, योगेशभाऊ लांडगे, तुषार सहाणे, पंडित गवळी, विराज लांडे, नगरसेविका सोनालीताई गव्हाणे, भीमताई फुगे, नम्रताताई लोंढे, राणीमाई पठारे, कविताताई भोंगाळे, अश्विनीताई वाबळे, रेखाताई देवकर, राजश्रीताई लांडगे, उद्योजक राजेश चेडे, संदीप झंझाड, राजेंद्र खोसे, मोहन राऊत सर, सुनील पोटे, संजय कुटे, दत्तात्रय आवारी, संचालक डॉ. आप्पासाहेब नरोडे, दत्तात्रय औटी, उत्तम नगरे, दत्तशेठ अंबुले, मुख्य कार्यकारी अधिकारी

ॲड. प्रशांत बढे साहेब, सोमनाथ वरखुडे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे संचालक, सभासद, कर्मचारीवृंद तसेच भोसरी परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला.

इस्रोच्या यादीत खामपिंप्री जि. प. शाळेचा तालुक्यात प्रथम क्रमांक


हातगाव : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शेवगाव तालुक्यातील खामपिंप्री येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इयत्ता आठवीच्या वर्गात शिक्षण घेणारी विद्यार्थिनी कु. कार्तिकी योगेश दसपुते हीचा अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी आयोजित केलेल्या डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर थुंबा ,केरळ शैक्षणिक सहल जिल्हास्तरीय परीक्षेत शेवगाव तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविल्याची अभिमानास्पद कामगिरी केली आहे. कु. कार्तिकी योगेश दसपुते हिने मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक कृष्णामुरारी गाडे यांनी दिली आहे.या बाबत ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या या यशामागे तिची मेहनत, जिद्द, अभ्यासातील सातत्य आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे मानले जात आहे. शाळेचे मुख्याध्यापक गाडे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे या यशातून फलित दिसून आले आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीही योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर जिल्हास्तरावर उल्लेखनीय यश मिळवू शकतात.

मोहटादेवी कुस्तीचा आखाडा रंगला : लाल मातीत राज्यभरातील मल्लांचा थरार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : डाव-प्रतिडावांची अविरत झुंज, चुरशीने खेळल्या गेलेल्या चितपट कुस्त्या, मल्लांच्या विजयाचा जल्लोष अशा एकापेक्षा एक सरस आणि थरारक कुस्त्यांनी श्री क्षेत्र मोहटादेवी यात्रेचा कुस्ती आखाडा लाल मातीत अक्षरशः गाजला. एखाद्या चित्रपटात शोभावा असा हा मल्लांचा थरार पाहून हजारो कुस्ती रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. हगाम्यात पुणे, कोल्हापूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, गेवराई अशा राज्यभरातील विविध भागांतून आलेल्या नामांकित पैलवानांनी आपले बाहू स्फुरत आखाड्यात शड्डू ठोकले. लाल मातीचा हा उत्सव ऐतिहासिक ठरवला. याप्रसंगी परिसरातील हजारो कुस्तीप्रेमी उपस्थित होते. सुमारे चार तास हा थरार रंगला.

मोहटादेवीवर भाविकांची अफाट श्रद्धा असल्याने हे देवी, माझी मनोकामना पूर्ण होऊ दे, मी तुझ्या आखाड्यात कुस्ती लावीन, असा नवस अनेक भाविक देवीला बोलतात. नवस फेडण्यासाठी आलेल्या भाविकांनी आखाड्यात बक्षिसांची बोली लावून कुस्त्या लावल्या. कुस्ती शौकिनांनी उत्स्फूर्तपणे लावलेल्या या कुस्त्यांच्या बक्षिसांची रक्कम



देवस्थान समितीच्या विश्वस्तांकडे रीतसर जमा करण्यात आली.

आखाड्यातील इतर सर्वच्या सर्व कुस्त्या निकाली झाल्यामुळे कुस्तीप्रेमींचा उत्साह द्विगुणित झाला. या कुस्ती हगाम्यात महिला कुस्तीपटूंनी घेतलेली झेप सर्वांचे आकर्षण ठरले . जालना येथील शितल पवार व छत्रपती संभाजीनगर येथील गीता राजपूत यांची कुस्ती कमालीची अटीतटीची आणि अविस्मरणीय ठरली. कुस्त्यांच्या या थरारासोबतच केरूळ (जि. बीड) येथील बाल योगासन पटू सीमा साबळे व आरती साबळे या भगिनींनी सादर केलेल्या अद्भूत योगासनांनी उपस्थितांची मने जिंकली . मोहटे गावातील विविध मान्यवरांनी 'पंच' म्हणून काम पाहिले. मोहटादेवी देवस्थान समितीचे विश्वस्त व मुख्याधिकारी यांनी सर्व सहभागी कुस्तीपटूंना आदराने आणि सन्मानाने बिदागी दिली असून देवीचा आशीर्वाद समजून मल्लांनीही कुस्त्या खेळल्या.

या संपूर्ण यात्रेच्या भव्य कुस्ती आखाड्यातील शेवटची आणि सर्वात प्रतिष्ठेची प्रथम क्रमांकाची लढत उत्तर महाराष्ट्र केसरी राहुरी (जि. अहिल्यानगर) येथील अनिल ब्राह्मणे आणि आष्टी (जि. बीड) येथील महाराष्ट्र केसरी कुस्तीपटू राहुल पोकळे यांच्यात झाली.

शेवगाव तालुक्यातील शेतकरी अस्मानी संकटाने कोलमडला

शेवगावात दोन्ही हंगाम वाया, ११३ गावांतील ९०, हजार शेतकरी संकटात.७६ हजार १३० हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त

दिपक खोसे । राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव : गतवर्षी अतिवृष्टीचा तडाखा आणि यंदा पावसाने फिरवलेली पाठ, अशा दुहेरी संकटाच्या कात्रीत शेवगाव तालुक्यातील बळीराजा पुरता अडकला आहे. यंदाच्या दुष्काळामुळे तालुक्यातील ११३ गावांमधील तब्बल ९० हजार ७३९ शेतकऱ्यांचे ७६ हजार १३० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

खरीप हातचा गेलाच, शिवाय जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने रब्बीच्या पेरण्याही ठप्प झाल्या. एका पाठोपाठ एक दोन हंगाम वाया गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, जुने तुटपुंजे निकष बाजूला ठेवून प्रतिशेतकरी किमान ५० हजार रुपयांची तातडीची थेट मदत द्यावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.

दुहेरी फटक्याने शेतकरी मेटाकुटीला आला असून पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिल्याने उसनवारी व कर्ज काढून बियाणे, खते आणि मशागतीवर केलेला हजारो रुपयांचा खर्च मातीत गेला. खरिपातील कपाशी व तूर या प्रमुख पिकांची अक्षरश वाताहत झाली. खरिपाने दगा दिला तरी रब्बी हंगाम तरी सावरून घेईल, ही आशाही जमिनीत ओलावा न राहिल्याने धुळीस मिळाली. पुढील वर्षाच्या पावसाळ्यापर्यंत म्हणजेच



वर्ष भर उत्पन्नाचे सर्वश्रेष्ठ बंद झाले आहे. तालुक्यातील शेतकरी अक्षरश हवालदिल झाला आहे. त्यातच जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे.

शासकीय पंचनाम्यातून समोर आलेले वास्तव शासनाच्या आदेशानुसार महसूल व कृषी विभागाने केलेल्या पंचनाम्यांत नुकसानीचे भीषण वास्तव समोर आले आहे. शेवगाव तालुक्यातील बाधित गावे: ११३ प्रभावित शेतकरी. ९० हजार ७३९ एकूण बाधित क्षेत्र: ७६ हजार १३० हेक्टर आहे. दोन हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र सुमारे ४,८०० हेक्टरआहे. तालुक्यामध्ये सर्वाधिक नुकसान कपाशी व तूर पिकांची प्रचंड हानी झाले आहे त्यामुळे जुने निकष कुचकामी असून नवे मदतीची गरज आहे. सध्याच्या शासकीय नियमानुसार जिरायतीसाठी प्रतिहेक्टर ८,५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी १७,००० रुपये आणि फळपिकांसाठी २२,००० रुपये मदतीची तरतूद आहे. मात्र, महागाई आणि शेतीचा वाढलेला उत्पादन खर्च पाहता ही मदत अत्यंत कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

> २०२३ च्या जीआर नुसारतालुक्यातील दुष्काळबाधित पिकांच्या नुकसानीचा सविस्तर पंचनामा अहवाल तयार करण्यात आला असून, आजच तो जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला जात आहे. शासनाच्या प्रचलित निकषांनुसार (जिरायत, बागायत व फळबाग) भरपाईचा प्रस्ताव पाठवला असून शासन स्तरावरून निर्णय होताच पात्र शेतकऱ्यांना मदत वितरित केली जाईल.
> **अंकुश जोगदंड**

शासनाने जिरायत-बागायत असा भेदभाव न करता सर्वांना बागायत क्षेत्राप्रमाणे भरीव मदत द्यावी, गतवर्षीसह चालू वर्षाचा थकीत पीक विमा तातडीने खात्यावर वर्ग करावा आणि दुष्काळग्रस्तांना किमान ५० हजार रुपयांचे थेट साहाय्य द्यावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

२६ ऑक्टोबर पासून अकोले ते मुंबई बांधकाम कामगारांचा भव्य लॉग मार्च

अहिल्यानगर : बांधकाम कामगार मंडळाकडून नोदणीकृत बांधकाम कामगारांना मिळणारे अर्थसहाय्य आणि कल्याणकारी योजनांचे लाभ बंद झाल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे बंद केलेले सर्व लाभ पुन्हा सुरु करावेत यासह विविध मागण्यासाठी कामगार नेते डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी अकोले ते मुंबई असा चारचाकी वाहनांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.या मोचो मध्ये सामील होण्याचे संघटनेचे कार्याध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये या बांधकाम कामगार मजुरांना पाण्या अभावी काम मिळणे मुश्किल झाले आहे. या परिस्थितीत शासनाने कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्या ऐवजी चालू असलेल्या सर्व आर्थिक लाभाच्या योजना बंद ठेवल्या आहेत, शासनाने बंद केलेल्या सर्व आर्थिक लाभाच्या योजना पुन्हा सुरु कराव्यात. त्याचबरोबर संघटनेने मागील आंदोलनातून मिळविलेली आरोग्य विमा योजना पुन्हा सुरू करावी या प्रमुख मागण्या बरोबरच दुष्काळी परिस्थितीत वीस हजार रुपये दिवाळी भेट कामगारांना मिळावी तसेच घरकुलासाठी पाच लाख रुपये अनुदान व ६० वर्षानंतर विनाअट ५००० प्रतिमाह निवृत्ती वेतन देण्यात यावे, त्याचबरोबर शिक्षणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य पूर्वीप्रमाणेच चालू ठेवावे, अशा विविध स्वरूपातील मागण्यांची पूर्तता करण्यासाठी अकोले ते मुंबई व्हेहीकल मार्च मध्ये आमची संघटना सामील होणार असून बांधकाम कामगारांनी आपल्या न्याय हक्क मागणीसाठी मोठ्या संख्येने सामील होण्याचे आवाहन संघटनेचे सरचिटणीस नंदू डहाणे व अध्यक्ष कॉ बाबा आरगडे यांनी केले आहे.

महावितरणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडलाचे 'थलाई कुथल' प्रथम

कोल्हापूर परिमंडलाचे 'समोरच्या घरात' द्वितीय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : महावितरणच्या 'नाट्यबहार' या आंतरप्रादेशिक राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडलाच्या 'थलाई कुथल' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कोल्हापूर परिमंडलाच्या 'समोरच्या घरात' या नाटकाला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. पुण्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, पद्मावती येथे २१ व २२ ऑक्टोबर रोजी झालेल्या या दोन दिवसीय स्पर्धेचा गुरुवारी सायंकाळी उत्साहात समारोप झाला. विविध सामाजिक विषयांवरील चार नाटकांच्या सादरीकरणातून महावितरणच्या कर्मचाऱ्यांमधील कलागुणांचा आविष्कार अनुभवायला मिळाला.

बक्षीस वितरण समारंभाला महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कार्यकारी संचालक परेश भागवत व अंकुर कावळे, कार्यकारी संचालक तथा पुणे प्रादेशिक संचालक सुनील काकडे आणि नागपूर प्रादेशिक संचालक राजेश नाईक, समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्यासह परीक्षक म्हणून राज काझी, अजय धनवे, शुभांगी पाठक व राज कुबेर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार म्हणाले, 'आव्हानात्मक परिस्थितीत दैनंदिन कामांची जबाबदारी सांभाळताना वीज कर्मचाऱ्यांनी आतील कलाकार आणि कला दोन्ही जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. अगदी व्यावसायिक नाटकांना साजेशी कामगिरी महावितरणचे कलाकार करत आहेत.' अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी चारही नाटकांचे सखोल विश्लेषण करून रसिक म्हणून नाट्यरूपी मेजवानीचा आस्वाद घेतल्याचे सांगत सर्व कलाकारांचे कौतुक केले.

प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली पुणे परिमंडलाने नाट्यस्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. प्रादेशिक संचालक म्हणून सुनील काकडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी सौ. मृदुला शिवदे व सौ. भक्ती जोशी यांनी सांभाळली. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे यांनी आभार मानले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कोकण प्रादेशिक विभागाचे 'ओल्या भिंती' आणि पुणे प्रादेशिक विभागाचे 'समोरच्या घरात', तर दुसऱ्या दिवशी छत्रपती संभाजीनगर विभागाचे 'वारी' आणि नागपूर प्रादेशिक विभागाचे 'थलाई कुथल' ही नाटके सादर झाली. या नाट्यप्रयोगांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेचा संपूर्ण निकाल पुढीलप्रमाणे :

नाट्यनिर्मिती
प्रथम क्रमांक – 'थलाई कुथल', नागपूर परिमंडल
द्वितीय क्रमांक – 'समोरच्या घरात', कोल्हापूर परिमंडल

दिग्दर्शन
प्रथम क्रमांक – प्रफुल्ल लांडे ('थलाई कुथल'),

नागपूर परिमंडल
द्वितीय क्रमांक – अमित बोकील ('समोरच्या घरात'), कोल्हापूर परिमंडल

नेपथ्य
प्रथम क्रमांक – विठ्ठल पाटील ('समोरच्या घरात')
द्वितीय क्रमांक – प्रिती फुले ('थलाई कुथल')

प्रकाशयोजना
प्रथम क्रमांक – सुजाता सोनटक्के ('थलाई कुथल')
द्वितीय क्रमांक – आशिष मेहता ('समोरच्या घरात')

पार्श्वसंगीत
प्रथम क्रमांक – धर्मदीप फुलझेले ('थलाई कुथल')
द्वितीय क्रमांक – आशिष कासार ('वारी')

रंगभूषा व वेशभूषा
प्रथम क्रमांक – समिधा लोहरे ('थलाई कुथल')
द्वितीय क्रमांक – दत्तात्रय भणगे ('समोरच्या घरात')

उत्कृष्ट अभिनेता
प्रथम क्रमांक – जयतीर्थ सांगलीकर (गीरंग विजयकर), 'समोरच्या घरात'
द्वितीय क्रमांक – असित रामटेके (अण्णा), 'थलाई कुथल'

उत्कृष्ट अभिनेत्री
प्रथम क्रमांक – श्वेता सांगलीकर (अनुराधा), 'समोरच्या घरात'
द्वितीय क्रमांक – प्रणाली निमजे (आई), 'ओल्या भिंती'

उत्तेजनार्थ पारितोषिके
पौर्णिमा पुरोहित (कृष्णाक्का) – 'समोरच्या घरात'
दिपाली नरवडे (सगुणा) – 'वारी'
संगीता चव्हाण (मेघा) – 'ओल्या भिंती'
प्रशांत मडावी (रामानुज अण्णा) – 'थलाई कुथल'

सोबत : मान्यवरांकडून प्रथम पारितोषिक घेताना नागपूरचे कलाकार

दखल

गोल्फ खेळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे! : सेवलेकर



पुणे : गोल्फ हा केवळ प्रतिष्ठेचा नव्हे, तर कौशल्य, एकाग्रता आणि अचूकतेचा खेळ आहे. हा खेळ देशातील सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन गोल्फ इंडस्ट्री असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ऑक्सफर्ड ग्रुपचे संस्थापक अनिरुद्ध सेवलेकर यांनी केले.

पुण्यातील प्रसिद्ध ऑक्सफर्ड गोल्फ रिसॉर्ट अँड क्लब येथे आयोजित राष्ट्रीय ऑक्सफर्ड प्रीमियर लीगच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. देशभरातील गोल्फपटूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या स्पर्धेमुळे गोल्फ खेळाच्या प्रसाराला चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.ऑक्सफर्ड प्रीमियर लीगच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय पर्वाला गोल्फप्रेमी आणि खेळाडूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धेत १६ संघांतील सुमारे १८० ते २५० खेळाडू सहभागी झाल्याची माहिती आयोजकांनी दिली. विविध संघांतील अनुभवी आणि प्रतिभावान खेळाडूंच्या सहभागामुळे स्पर्धेतील प्रत्येक सामना चुरशीचा आणि रोमांचक ठरण्याची अपेक्षा आहे. या लीगमध्ये ईगल फोर्सेस,सुलतान ऑफ स्विंग्स, झिंगर्स, ग्रीन ग्लॅडिएटर्स, रोरिंग टायगर्स , सुब्बन सनरायझर्स, द लीगशी क्लब आणि बर्डी स्क्वॉड ,झिंगर,गोल्डन ईग्ल्स,बिनधास्त बॉयज,,जॅग्वार्स ,वॅस्कॉन पूना लायन्स यांसारख्या संघांचा सहभाग आहे.

अंगावर गरम पाणी पडल्याने बालिकेचा मृत्यू

तळेगाव ढमढेरे : वढू बुद्रुक (ता.शिरूर) येथील गावठाण येथे अंगावर गरम पाणी पडून भाजल्याने गंभीर जखमी झालेल्या साडेचार वर्षीय मधुरा मुकुंद केळकर या बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथील गावठाण येथे राहणाऱ्या मुकुंद केळकर यांच्या घरात अंघोळीसाठी पाणी तापवले असता सदर पाणी जास्त गरम झालेले होते, गरम पाण्याची बादली बाथरुम मध्ये ठेवली असताना बाथरुम मध्ये गेलेली बालिका मधुरा केळकर पाय घसरून पडल्याने बदली मध्ये असलेले गरम पाणी मधुरा या बालिकेच्या अंगावर पडून मधुरा भाजल्याने गंभीर जखमी झाल्याने तिला उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, उपचार सुरु असताना मधुरा मुकुंद केळकर (वय ४.५ वर्षे रा. वढु बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) हिचा मृत्यू झाला असून याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार नवनाथ नाईकडे हे करत आहे.

तळेगाव ढमढेरे येथे विहिरीत पडल्याने एकाचा मृत्यू

तळेगाव ढमढेरे : तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथे विहिरीचे काम करणाऱ्या कामगाराचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना घडली असून गंगाराम बंडू कुऱ्हाडे असे मृत कामगाराचे नाव आहे. तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील गणेश मळा येथे सुनील ढमढेरे यांच्या विहिरीचे काम सुरु असून सदर ठिकाणी विहिरीचे काम करणारे कामगार विहिरीच्या बाजूला जवळच राहत आहेत.

काम सुरू असल्याने हरिचंद्र गायकवाड, सतीश गायकवाड, सुरेश गायकवाड व गंगाराम कुऱ्हाडे हे विहिरीच्या बाजूला राहत असताना गंगाराम कुऱ्हाडे हा दारु पिऊन येऊन झोपला होता, सकाळच्या सुमारास गंगाराम दिसत नसल्याने तो बाजूला गेला असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला, मात्र सकाळच्या सुमारास विहीर मालक सुनील ढमढेरे विहिरीकडे आले असता त्यांना विहिरीमध्ये एक इसम पडल्याचे दिसून आले, याबाबतची माहिती मिळताच पोलीस हवालदार अमोल चव्हाण यांनी सदर ठिकाणी धाव घेत नागरिकांच्या मदतीने इसमाला बाहेर काढले असता तो गंगाराम असल्याचे दिसून आले, त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी गंगाराम बंडू कुऱ्हाडे (वय ३७ वर्षे रा. टाकळी ता. पैठण जि. संभाजीनगर) याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत हरिचंद्र गोविंद गायकवाड (वय ५० वर्षे सध्या रा. गणेश मळा तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. बोरगाव ता. गेवराई जि. बीड) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रशांत गायकवाड हे करत आहे.

खत खरेदीसाठी 'एफएफएस' प्रणाली २२ ऑक्टोबरपासून राज्यभर

शेतकऱ्यांना घरबसल्या खत बुकिंगची सुविधा; तीन दिवसांत खरेदी करता येणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : अनुदानित रासायनिक खतांची खरेदी अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी केंद्र शासनाने विकसित केलेली 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल'(एफएफएस) ही मोबाईल ॲप आधारित प्रणाली २२ ऑक्टोबरपासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना जवळच्या खत विक्री केंद्रावरील खतांची उपलब्धता तपासून घरबसल्या आगाऊ बुकिंग करता येणार आहे.

बुकिंग केल्यानंतर तीन दिवसांच्या आत आपल्या सोयीनुसार खत खरेदी करता येणार असल्याने खतांसाठी होणारी धावपळ आणि विक्री केंद्रांवरील प्रतीक्षा कमी होण्यास मदत होईल. या प्रणालीचा पथदर्शी प्रकल्प ५ जून २०२६ पासून पहिल्या टप्प्यात कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत राबविण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात २५ ऑगस्टपासून लातूर आणि वाशीम, तर २७ ऑगस्टपासून पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत अंमलबजावणी सुरू करण्यात आली. आता २२ ऑक्टोबरपासून ही प्रणाली राज्यभर लागू झाली आहे.

एफएफएस हे मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक किंवा आधार क्रमांकाद्वारे ॲपमध्ये प्रवेश करता येईल. त्यानंतर शेतजमिनीचे क्षेत्र प्रमाणित करून पिकाची निवड करावी लागेल. पिकासाठी शिफारस केलेल्या खतांच्या प्रमाणानुसार किंवा स्वतःच्या गरजेनुसार खताचे प्रमाण निश्चित करून जवळच्या विक्रेत्याकडे क्यूआर कोडच्या माध्यमातून बुकिंग करता येईल. बुकिंगनंतर तीन दिवसांच्या आत संबंधित विक्री केंद्रावर क्यूआर कोड दाखवून खत खरेदी करता येईल. शेतकरी स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधीमार्फतही खत घेऊ शकतील.

सध्या खत विक्री केंद्रावर गेल्यानंतरच अनेकदा संबंधित खत उपलब्ध आहे किंवा नाही, याची माहिती मिळते. नव्या प्रणालीमुळे खतांचा साठा आणि उपलब्धता मोबाईलवर समजणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उपलब्धतेनुसार खरेदीचे नियोजन करता येईल. तसेच आवश्यक खतांचे आगाऊ बुकिंग केल्यामुळे इतर अनावश्यक खते किंवा कृषी निविष्ठा खरेदी करण्याची सक्ती टाळण्यास मदत होईल. खतांची छापील किमतीपेक्षा अधिक दराने विक्री होण्यास आळा घालण्याबरोबरच खत विक्री व्यवहारात पारदर्शकता आणण्याचाही या प्रणालीचा उद्देश आहे.

या प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून ॲप वापरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून सोडविण्यात आल्या आहेत. प्रणाली सुरळीतपणे कार्यान्वित राहण्यासाठी अडचणींच्या निराकरणाबाबत नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.



पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जागतिक बँकेचे पुणे महापालिकेला सहकार्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : जागतिक बँक समूहाच्या वरिष्ठ शिष्टमंडळाने शुक्रवारी (ता. २३) पुणे महानगरपालिकेला भेट देऊन शहरातील पायाभूत सुविधांचा विकास, तांत्रिक सहकार्य आणि शाश्वत नागरी सेवांबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. शहरातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन पाणीपुरवठा, मलनिस्सारण आणि पावसाळी पाणी निचरा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी संभाव्य सहकार्य आणि वित्तपुरवठ्याच्या संधींचा आढावा या वेळी घेण्यात आला.

जागतिक बँक समूहाच्या जल क्षेत्राच्या प्रादेशिक संचालक मारा वॉर्विक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापालिका अधिकाऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा केली. या बैठकीला अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी उल्का कळसकर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप, प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे आणि पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २४ ऑक्टोबर राष्ट्रीय कार्यशाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : महात्मा जोतीराव फुले यांच्या समतावादी विचारांचा, सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानाचा आणि शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा आजच्या तरुणाईशी संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी), समर्थ युवा फाऊंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा फुले आणि आजची तरुणाई' या तीन दिवसीय निवासी राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ शनिवारी २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती एनबीटीचे विश्वस्त राजेश पांडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

राज्याचे बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा आणि दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समता, शेतकरीहित आणि वंचितांच्या हक्कांसाठी केलेले कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा समकालीन संदर्भात अभ्यास करून ते आजच्या युवकांच्या जीवनाशी,एनबीटीच्या सहभागातून युवकांमध्ये वाचनाची आवड, वैचारिक प्रगल्भता आणि महापुरुषांच्या विचारांचा चिकित्सक अभ्यास करण्याची वृत्ती विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. तीन दिवसीय निवासी कार्यशाळेच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांचे वर्तमानकालीन महत्त्व अधोरेखित करत युवकांमध्ये सामाजिक समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांची जाणीव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे पांडे यांनी सांगितले.

चिमुकली गार्गीच्या उपचारांचा मार्ग मोकळा; १० कोटींचा निधी जमा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वाघोली : दुर्मिळ स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी (एसएमए टाइप-१) या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या वाघोलीतील एक वर्षाच्या गार्गी संदीप जाधव हिच्या उपचारांसाठी आवश्यक असलेला १० कोटी रुपयांचा निधी अखेर जमा झाला आहे. १ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या मदत मोहिमेला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १९ ऑक्टोबर रोजी निधी उभारणीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने गार्गीच्या उपचारांचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच उपचार सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. गार्गीला एसएमए टाइप-१ हा दुर्मिळ आजार झाला आहे. या आजारामुळे शरीरातील स्नायूंवर गंभीर परिणाम होतो. तिच्या उपचारांसाठी 'झोलगेन्स्मा' हे महागडे इंजेक्शन आवश्यक असून, त्यासाठी सुमारे १० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. एवढी मोठी रक्कम उभी करणे जाधव कुटुंबीयांसमोर मोठे आव्हान होते.

कुटुंबीयांनी आर्थिक मदतीचे आवाहन केल्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून ही मोहीम वेगाने राज्यभर पोहोचली. विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते, सोशल मीडिया प्रभावक आणि सर्वसामान्य नागरिकांनी सढळ हाताने मदत केली.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.

दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramingmail.com
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ४९/२०२६-२७/३३५६ पुणे,
दिनांक: १९/१०/२०२६

श्री चिंतामणी कॉम्प्लेक्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत
पत्ता: गट नं. १६२ (जुना), प्लॉट नंबर ए-५. गट नं. १६२/१ (नवीन), प्लॉट नंबर ५. सायलो हिल. जळोची. ता. बारामती, जि. पुणे
तर्फे अध्यक्ष श्री मुकुंद विश्वासराव जगदाळे - अर्जदार

विरुध्द

१) श्री राजेंद्र दिनकरराव पवार रा. काटेवाडी.ता.बारामती.जि.पुणे.
२) श्री रमणिक रामजी मोता ३) श्री अभय रामचंद्र शहा
४) श्री रफिक तैयब अली भोरो ५) श्री सुमतीलाल पोपटलाल शहा
६) श्री पोपटलाल चंदनमल ओसवाल
वरील क्रमांक ०२ ते ०६ सर्व रा. बारामती, ता. बारामती, जि. पुणे.

जाबदेणार

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक ०२/११/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत. ५. बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व बेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेष करून गाव मौजे भराडी, ता. आंबेगाव, जि. पुणे परिसरातील व आंबेगाव तालुक्यातील आम जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे भराडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील गट नं. १६४ क्षेत्र ०० हे. २२ आर, अधिक खराबा ०० हे. ०८ आर, एकुण क्षेत्र ०० हे. ३० आर, आकार ०० रूपये ३६ पैसे, व गट नं. १६६ क्षेत्र ०० हे. १६ आर, अधिक खराबा ०० हे. ०२ आर, एकुण क्षेत्र ०० हे. १८ आर, आकार ०० रूपये १९ पैसे ही जमिन आमची एकत्र कुटुंबात एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातुन वडील कै. खंडु बाबुराव गाडेकर यांचे नावे खरेदी केलेल्या आहेत. कै. खंडु बाबुराव गाडेकर यांना वारस पत्नी श्रीमती. लक्ष्मीबाई खंडु गाडेकर, मुले श्री. पोपट खंडु गाडेकर, श्री. अनिल खंडु गाडेकर, श्री. सुनिल खंडु गाडेकर, मुली अलका विश्वनाथ राजगुरु, रंजना दौलत रोकडे अशी अपत्य असताना नातु संतोष पोपट गाडेकर याने वडीलांचे अडाणी व अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेउन बक्षीसपत्राने नोंदवुन घेतलेल्या आहेत. सदर मिळकतीमध्ये आम्हा सर्वांचा वडीलोपार्जित समान हक्क हिस्सा आहे. सदर बक्षीसपत्राचे व इतर मिळकतीमध्ये वाटप मिळण्याकरीता आम्ही घोडेगाव मे. दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. १२६/२०२२ दाखल आहे. सदर दाव्यात संतोष पोपट गाडेकर हे हजर झालेले आहेत. सदरचा दावा अद्याप प्रलंबित आहे. सदर मिळकतीमध्ये आमचा वडीलोपार्जित अविभक्त हिस्सा आहे. आमचे वडील कै. खंडु बाबुराव गाडेकर यांचे अशिक्षीत आडाणीपणाचा फायदा घेउन संतोष पोपट गाडेकर यांनी लिहुन घेतलेले वरील मिळकतींचे बक्षीसपत्राचे आधारे स्वःतच्या नावावर आलेली मिळकतींबाबत कोणीही त्यांचेकडून वर नमुद केलेल्या वडीलोपार्जीत शेतमिनीचे तबदीलपत्र लिहुन देण्याची शक्यता आहे. म्हणून हे नोटीस प्रसिध्दीस दिलेले आहे.तरी मौजे भराडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील गट नं. १६४,१६६ मधील शेतजमिनीचे श्री. संतोष पोपट गाडेकर यांचेकडून कोणीही खरेदीखत, साठेखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, इत्यादी कोणत्याही प्रकारचे तबदीलपत्र लिहुन घेवू नये, त्यास आमची तीव्र हरकत आहे व राहील. तसेच तसा व्यवहार करणाऱ्यास जमिनीची मालकी अथवा ताबा मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

मंचर :
दिनांक : २३/१०/२०२६

श्री. व्ही.एन. चासकर
ॲडव्होकेट व नोटरी, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. मोबाईल: ९०९६०६९१८०

शिरूरमध्ये हातभट्टी दारू अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

१ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त, चौघांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरूर : शिरूर शहरातील मार्केट यार्डसमोरील गोपाळवस्ती परिसरात गावठी हातभट्टी दारूची निर्मिती आणि अवैध विक्री सुरू असल्याचे आढळून आल्याने शिरूर पोलिसांनी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी मोठी कारवाई केली. या कारवाईत तयार गावठी दारू आणि दारूनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे कच्चे रसायन असा एकूण १ लाख २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार जणांना अटक करण्यात आली आहे. अन्य नऊ जणांचा पोलीस शोध घेत आहेत.

पोलिसांनी गोपाळवस्ती परिसरात कारवाई केली



असता, विविध ठिकाणी गावठी हातभट्टी दारू तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे आढळून आले. तसेच तयार दारू आणि दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कच्चे रसायन साठवून ठेवल्याचेही निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळावरून हा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी नंदा जनार्दन पवार (वय ५०), मीना युवराज गव्हाणे (वय ३५), राहुल विश्वनाथ पवार (वय ३५) आणि सुभाष विश्वनाथ पवार (वय ४४, सर्व रा. गोपाळवस्ती, मार्केट यार्डसमोर, शिरूर) यांना अटक करण्यात आली आहे.

तर कविता किरण पवार, कमल जयसिंग गव्हाणे, सतीश जयसिंग गव्हाणे, सरस्वती पवार, सविता राजकुमार गिरे, संजय छबुराव जाधव, रमेश छबुराव जाधव, राजेंद्र छबुराव जाधव आणि उमेश संजय जाधव हे अन्य नऊ आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांची चाहूल लागताच काही जण घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), ६५ (फ) आणि ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव भोसले आणि पोलीस पथकाने ही कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नकाते करीत असून, गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हवालदार टेंगले यांनी केली.

गोपाळवस्ती परिसरातील या कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्रीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, या व्यवसायात सहभागी असलेल्या इतरांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

द•ख•ल



अस्पायर प्रतिष्ठानतर्फे आदर्श शिक्षिका म्हणून सुवर्णा प्रकाश पठारे यांचा गौरव

पारनेर : अस्पायर प्रतिष्ठानच्या वतीने नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बगडी, तालुका गंगापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील उपक्रमशील शिक्षिका सुवर्णा प्रकाश पठारे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांनी सेवाकाळात राबवलेल्या विविध शैक्षणिक, सामाजिक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन प्रतिष्ठानने हा पुरस्कार जाहीर केला. शैक्षणिक प्रगती आणि गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञान आवड निर्माण केल्याबद्दल समाजाचा सहभाग आणि पालकांशी शाळा आणि समाज यांच्यातील दुवा मजबूत केल्याबद्दल अभ्यासाव्यतिरिक्त उपक्रम खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतर उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यावर त्यांनी चांगले काम केले आहे.नाशिक येथील सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून बगडी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये ब्युटी पार्लर सर्टिफिकेट कोर्सचा समारोप



पारनेर : शिक्षणाला व्यावसायिक कौशल्यांची जोड मिळाली की, आत्मविश्वासाचे पंख मिळतात, याचा प्रत्यय पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात पाहायला मिळाला. महाविद्यालयात महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'ब्युटी पार्लर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप अत्यंत उत्साही आणि चैतन्यमय वातावरणात पार पडला. या प्रशिक्षणात कौशल्यांचे धडे घेतले. महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्ष, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खट-उ) आणि कनिष्ठ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ३८ विद्यार्थिनींनी यात यशस्विरित्या सहभाग नोंदविला. मुलींना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि भविष्यात स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या हेतूने हे व्यावहारिक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध ब्युटीशियन सौ. राजश्री भिसे यांनी विद्यार्थिनींना सौंदर्य क्षेत्रातील व्यवसायाचे विविध बारकावे समजावून सांगितले. सौंदर्यसेवा (ब्युटी अँड वेलनेस) क्षेत्रातील वाढत्या संधींवर प्रकाश टाकताना त्या म्हणाल्या, आजच्या काळात ब्युटी पार्लर हे केवळ रोजगाराचे साधन नसून एक मोठा उद्योग बनला आहे.

शालेय स्वच्छता हा संस्कार; तो रोजच जपला पाहिजे : विजय बेरड

अहिल्यानगर : शाळा ही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे महत्त्वाचे केंद्र असून, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय रुजविणे ही काळाची गरज आहे. घराप्रमाणेच शाळा, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणेही स्वच्छ ठेवली पाहिजेत. स्वच्छता हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून तो आपल्या दैनंदिन जीवनाचा आणि संस्कारांचा भाग बनला पाहिजे. त्यामुळे भिंगार येथील बट शैक्षणिक संकुलाने राबविलेले संपूर्ण विद्यालय स्वच्छता अभियान कौतुकास्पद असून, असे अभियान दररोज राबवून शाळेचा परिसर नेहमीच स्वच्छ ठेवावा, अशी अपेक्षा, उद्योजक तथा स्कूल कमिटीचे सदस्य (प्राथमिक विभाग) सदस्य इंजि.विजय बेरड यांनी व्यक्त केली. श्रीमती बट मायादेवी गुरुदत्ताशाह हायस्कूल व विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या आदेशानुसार संपूर्ण विद्यालय स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यालयाचा संपूर्ण परिसर, मैदान आणि शालेय इमारतीची स्वच्छता करण्यात आली. सुमारे तीन एकर परिसरात विस्तारलेल्या या विद्यालयातील प्रत्येक भाग स्वच्छ करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांनी एकत्रितपणे श्रमदान करून शाळेचा परिसर स्वच्छ व चकाचक केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्वर संदीप यांनी केले, तर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक नारायण अनभुले यांनी आभार मानले. या स्वच्छता अभियानात प्राचार्य, पर्यवेक्षक, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, माध्यमिक व प्राथमिक विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून विद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

समर्थच्या इशिता काकडेची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड



निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे येथील विद्यार्थिनी इशिता काकडे हिने रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशाच्या जोरावर तिची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. इशिताच्या या यशामुळे समर्थ शैक्षणिक संकुलाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. रायफल शूटिंगसारख्या खेळामध्ये एकाग्रता, अचूकता, संयम आणि सातत्यपूर्ण सराव यांना विशेष महत्त्व असते. या गुणांच्या जोरावर इशिता काकडे हिने विभागीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेतील तिच्या या यशामुळे तिला आता राज्यस्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही ती यशस्वी कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

धरणांत पाणी, तरी शेतकऱ्यांच्या शेतात ठणठणाट!

आवर्तनासाठी शेतकऱ्यांचा नगर-दौंड महामार्गावर एल्गार; दोन तास रास्ता रोको

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : धरणांत पाणी असताना शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्याचे आवर्तन नेमके अडले कुठे? फळबागा आणि उभी पिके पाण्याअभावी संकटात असताना शेतकऱ्यांनी आणखी किती दिवस प्रतीक्षा करायची? या ज्वलंत प्रश्नांवरून श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांचा संताप अखेर रस्त्यावर उसळला. शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली घारगाव येथे नगर-दौंड महामार्गावर सुमारे दोन तास रास्ता रोको आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. आवर्तनाची तारीख जाहीर करा, शेतकऱ्यांना पाणी द्या; अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करू, असा थेट इशारा यावेळी देण्यात आला.

तालुक्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर बनत असताना फळबागा आणि उभी पिके वाचविण्यासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. मात्र, आवर्तनाबाबत ठोस तारीख जाहीर होत नसल्याने आणि तलावांतील पाणी उपशावरील बंदी कायम असल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. आश्वासनांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष निर्णय कधी होणार, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.

आंदोलनात राजेंद्र म्हस्के यांनी लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. धरणांत पाणीसाठा असताना शेतकऱ्यांना आवर्तन का दिले जात नाही? आवर्तनाचे आश्वासन दिले



जात असताना तलावांतील पाणी उपशावरील बंदी का उठवली जात नाही? शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगपतींना देण्याचा काही डाव आहे का? असे सवाल उपस्थित करत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

निवडणुकांच्या राजकारणापेक्षा शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. शेतकरी दुष्काळाच्या संकटाशी झुंजत असताना लोकप्रतिनिधी निवडणुका बिनविरोध करण्याच्या चर्चेत व्यस्त आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध निवडणुकीची भूमिका मांडणारे आमदार विक्रम पाचपुते यांनी आवर्तनाच्या तारखेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी म्हस्के यांनी केली.

खा. नीलेश लंके यांना निवडून दिल्यानंतर तालुक्याला काय मिळाले, असा सवाल करत म्हस्के यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भूमिकेवरही टीका केली. राजकीय पराभवाच्या रागातून श्रीगोंदा तालुक्यावर अन्याय होत असल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न राजकारणात अडकवू नका. तातडीने आवर्तन सोडण्याचा निर्णय घ्या; अन्यथा शेतकऱ्यांचा संघर्ष अधिक तीव्र होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे यांनीही निवडणुकांसाठी बैठका घेतल्या जातात; मात्र शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी वेळ दिला जात नाही, अशी टीका केली. पाण्याच्या मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला.

यावेळी भास्कर वागस्कर, डॉ. अनिल कोकाटे, एकनाथ बारगुजे, अशोक नवले, बाळासाहेब नलगे, राजेंद्र इधाटे, बापूसाहेब निंभोरे, गोरख उंडे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. नितीन डुबल, विश्वास थोरात, लक्ष्मण मचे, रघुनाथ खामकर, तुकाराम कळमकर, आप्पासाहेब शिंदे, सोपान शिंदे, सुभाष दरेकर, महादेव म्हस्के, राजेंद्र पोकळे आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूषण बडवे यांनी सूत्रसंचालन केले, तर शरद जगताप यांनी आभार मानले.

आपटा वृक्षाचे पूजन करून निसर्गसंवर्धनाचा जागर!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



कोरडगाव : 'निसर्ग हेच शाश्वत सत्य, बाकी नश्वर!' हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आनंदवन मांडवा येथील जैवविविधता उद्यानात आपटा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दसऱ्याच्या सणाला आपट्याची पाने सोन्याचे प्रतीक मानून त्यांची देवाणघेवाण करण्याची परंपरा आहे. मात्र, या परंपरेच्या नावाखाली आपटा वृक्षांच्या फांद्यांची बेसुमार तोड होत असल्याने या वृक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर आपटा वृक्षाचे पूजन करून त्याचे जतन व संवर्धन करण्याचा संकल्प या महोत्सवाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला.

आपटा वृक्षाचे आयुर्वेदिक महत्त्व अनन्यसाधारण असून जैवविविधतेच्या साखळीतही या वृक्षाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मात्र, वृक्षतोडीचे प्रमाण असेच वाढत राहिल्यास भविष्यात हा वृक्ष दुर्मीळ होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे दसऱ्याची परंपरा जपत आपट्याच्या फांद्या तोडण्याऐवजी वृक्षाचे रोपण, संगोपन आणि संवर्धन करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

या कार्यक्रमाला ऊर्जा गुरुकुल, अहिल्यानगरच्या संचालिका कल्याणी फिरोदिया आणि ऐसा, अहिल्यानगरचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोगत व्यक्त करताना कल्याणी फिरोदिया म्हणाल्या की, आपटा वृक्ष जपला, तरच दसरा सण खऱ्या अर्थाने साजरा होईल. पर्यावरणाविषयी जनजागृती होणे अत्यंत गरजेचे असून प्रत्येकाने आपट्याच्या फांद्या तोडण्याऐवजी या वृक्षाचे रोपण करून त्याचे संवर्धन करावे. निसर्ग आणि सण-उत्सव यांचे नाते अतूट असून परंपरा जपत पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

आपटा महोत्सवाच्या निमित्ताने वृक्षपूजनासोबतच निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. आपट्याची पाने तोडून एकमेकांना देण्यापेक्षा आपट्याचे रोप लावून त्याचे संगोपन करणे, हाच पर्यावरणपूरक दसऱ्याचा खरा संदेश असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या प्रसंगी इंजि. जयप्रकाश विधाटे, अमित गायकवाड, शंतनू खानविलकर, संदीप राठोड, नीता राठोड, सूर्यकांत काळोखे, सुनील मरकड, गणेश कांबळे, शंकर बर्डे, राजू मरकड, ज्ञानेश्वर चिकणे, संदीप शिदोरे आणि संतराम साबळे यांच्यासह पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

सुपा परिसरात जिल्हा बँकेच्या निवडणुकीवरून चर्चेला उधाण!

खा. निलेश लंके की मंत्री विखे पाटील यांचे समर्थक राहुल शिंदे-पाटील? सहकाराच्या राजकारणात प्रतिष्ठेची लढत!

विशाल फटांगडे। राष्ट्र सह्याद्री

सुपा : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुपा परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. येत्या २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, पारनेर तालुक्यातील सहकारी सोसायटी मतदारसंघातून कोण बाजी मारणार, याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. विद्यमान खासदार निलेश लंके आणि राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे समर्थक मानले जाणारे भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे-पाटील यांच्यातील राजकीय समीकरणांची चर्चा सध्या सुपा परिसरात रंगू लागली आहे.

दोन्ही बाजूंच्या समर्थकांकडून आपापल्या नेत्यांच्या विजयासाठी गणिते मांडली जात असून, ही निवडणूक सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठेची लढत ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठरावांच्या संख्येवरून दोन्ही बाजूंकडून दावे-प्रतिदावे केले जात आहेत. एका बाजूने आपल्याकडे अधिक ठराव असल्याचा दावा केला जात आहे, तर दुसऱ्या बाजूनेही आपले संख्याबळ अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

दोन्ही गटांकडून संख्याबळाचे वेगवेगळे दावे होत असल्याने प्रत्यक्षात कोणाची बाजू किती मजबूत आहे, याबाबत उत्सुकता वाढली आहे. या दाव्यांची सत्यता मतदानातूनच स्पष्ट होणार असल्याने सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्हा बँकेच्या संचालकपदावर सुमारे १५ वर्षे शेळके दाम्पत्याची परंपरा राहिल्याची चर्चा आहे. आता या निवडणुकीत नव्या नेतृत्वाला संधी मिळणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. राहुल शिंदे-पाटील यांना संधी मिळणार की खासदार निलेश लंके यांचे पारडे जड ठरणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू आहेत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची संस्था आहे. शेतकरी, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांमध्ये बँकेच्या संचालक मंडळाची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे पारनेर तालुक्यातील या निवडणुकीकडे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे.

सुपा परिसरातील गावोगावी, चहाच्या टपऱ्यांवर आणि सहकारी संस्थांच्या वर्तुळात या निवडणुकीची चर्चा रंगत आहे. ठरावांचे दावे, समर्थकांची गणिते आणि राजकीय प्रतिष्ठा यामुळे निवडणुकीतील उत्सुकता वाढली आहे.

आता सर्वांचे लक्ष २ नोव्हेंबरच्या निवडणुकीकडे लागले आहे. मतदारांचा कौल कोणाला मिळणार आणि जिल्हा बँकेच्या संचालकपदासाठी कोणाला संधी मिळणार, याचे उत्तर निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होईल.

लेक वाचवा, देश वाचवा' हा संदेश भावी पिढीसाठी महत्त्वपूर्ण : डॉ. कोकाटे.



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, बहिःशाल शिक्षण मंडळ आणि लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला अंतर्गत पहिल्या पुष्पाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी प्रमुख व्याख्यात्या डॉ. गुंफा कोकाटे यांनी 'लेक वाचवा, देश वाचवा' या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनातून डॉ. गुंफा कोकाटे यांनी मुलींचे संरक्षण, स्त्री-पुरुष समानता, मुलींचे शिक्षण आणि समाजातील महिलांचे स्थान यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रकाश टाकला. मुलगी ही कुटुंबाचा आणि समाजाचा आधार असून, तिच्या शिक्षणातूनच सशक्त कुटुंब, प्रगत समाज आणि सक्षम राष्ट्राची निर्मिती होते, असे त्यांनी अधोरेखित केले. मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या विचारप्रवर्तक व्याख्यानातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि स्त्री-सन्मानाची भावना निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

कायदासुव्यवस्था अबाधित राखत नवरात्रोत्सव शांततेत पार पाडला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री जगदंबा देवी तथा यमाई मातेच्या शारदेय नवरात्रोत्सवापासून ते विजयादशमीच्या पालखी सोहळ्यापर्यंत संपूर्ण उत्सवकाळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या कर्जत व राशीन पोलीस प्रशासनाचा फेटा बांधून, गुलाबपुष्प व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. पोलिसांच्या नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे उत्सव निर्विघ्न, शांततेत आणि आनंदमय वातावरणात पार पडला. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नवरात्रोत्सवाच्या प्रारंभापासून सांगतेपर्यंत मंदिर परिसरातील गर्दीचे नियोजन, दर्शनरांगेची व्यवस्था, भाविकांना मार्गदर्शन, वाहतूक नियंत्रण आणि संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त अशा विविध जबाबदाऱ्या पोलिसांनी समर्थपणे सांभाळल्या. लाखो भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या पालखी सोहळ्यादरम्यानही कोणताही अनुचित प्रकार घडू न देता पोलिसांनी संयम, तत्परता आणि समन्वयाचे दर्शन घडवले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांशी आदरपूर्वक वागणूक देत सुरक्षित व सुरळीत दर्शनासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

पालखी सोहळ्याची सांगता झाल्यानंतर गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता जिजाई मंगल कार्यालय येथे वार्ताहर ऋषभ परदेशी यांनी नागरिक म्हणून पुढाकार घेत कर्जत व राशीन पोलीस प्रशासनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी छोटेखानी सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता.

सकाळचे ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उकिरडे, पुढारीचे पत्रकार विजय सोनवणे, आरपीआयचे कर्जत तालुक्यातील नेते भीमराव साळवे, नष्टे सर, महादेव सायकर सर, साके सर, ड. शुभम पानसरे, संतोष ढावरे, सुरेश कोंडलकर, अतुल साळवे, जितेंद्र गजरमल, सूरज भाले आदी मान्यवरांच्या हस्ते पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फेटा बांधून, गुलाबपुष्प आणि श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. पो. नि. हनुमान गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब मुळीक, पोलीस उपनिरीक्षक अजिनाथ बटुळे, सहायक फौजदार अण्णासाहेब चव्हाण, पोलीस हवालदार प्रवीण सुतार, पोलीस कर्मचारी विशाल क्षीरसागर, अमोल रायकर, किरण बोराडे, प्रकाश दंदाडे, अर्जुन पोकळे, गोविंद हिंगे, मनोज मुरकुटे, चांगदेव कुमटकर, सचिन झुनगुरे, योगेश सुपेकर, नितीन धस यांच्यासह बंदोबस्तात सहभागी पोलीस बांधवांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सण-उत्सवाच्या काळात नागरिक आनंदाने उत्सव साजरा करत असताना पोलीस बांधव मात्र अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उकिरडे यांनी केले, तर पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी उपस्थित मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

लोककलांचा मोबाईलमुळे घटला रसिक वर्ग; कलावंतांची खंत

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : दुष्काळी परिस्थिती समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण कला व लोककलाकार कमी होत आहेत . नव्या पिढीला आवड नसल्याने जनाधार घटत आहे. यामुळे घटत चाललेली कलाकारांची संख्या अशी अनुभूती मोहटादेवी यात्रेनिमित्त संपन्न झालेल्या कलाकारांच्या हजेऱ्या कार्यक्रमातून झाली.

शारदीय नवरात्रोत्सवा निमित्त अश्विन शुद्ध एकादशीला म्हणजे दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मोहटा देवीची यात्रा भरते. याचे कारण या दिवशी गडावर देवी प्रकट झाल्याची कथा सांगितली जाते. यापूर्वी मध्य प्रदेश, कर्नाटक, गुजरात, राज्यातूनही कलेच्या माध्यमातून राज्यभर भटकंती करून रोजी रोटी कमविणाऱ्या कलाकारांच्या कला बघण्यासाठी हजारो भाविक गर्दी करत. गेल्या काही वर्षांमध्ये मोबाईल सह विविध प्रकारची समाज माध्यमे अत्यंत वेगाने समाजमनाच्या मानगुटीवर बसली असून खरे कलाकार, रूढी, परंपरा, ग्रामीण लोकजीवन, अशा सर्व गोष्टींचा विसर पडत चालला आहे. यात्रेच्या दिवशी यात्रेकरूंचे मनोरंजन करायचे. ग्रामस्थांकडून मानपानाने मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ घ्यायचा. सकाळी देवी मंदिराच्यागडाच्या पायथ्याला असलेल्या आखाड्यामध्ये देवीची सेवा म्हणून कलेचा प्रकार सादर करायचा. उपस्थितांचे मनोरंजन करत राज्यभर भटकंती



करण्यासाठी देवीची करुणाभा भाकत देवीपुढे समृद्धीची कामना करायची. देवस्थान समितीकडून बिदागी घेऊन राज्यभर फिरतीला नीघ्यायचे. असा दिनक्रम ठरलेला असतो. यंदा ग्रामीण कलाकारांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. नवे कलाकार कलाप्रकार शिकत नाहीत. जुन्या कलाकारांना आता पूर्वीसारखी कला सादर करणे शक्य होत नाही. अशी परिस्थिती आहे. चुकून चार दोन जणांनी कलेच्या माध्यमातून मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला तर कला पाहण्यासाठी आलेले प्रेक्षक बहुसंख्येने तमाशा कलावंत व त्यांची विनोदी शैलीतील कला बघण्यासाठी आलेले असतात. त्यामुळे अन्य कलाकारांना प्रेक्षकांकडून फारसा प्रतिसाद सुद्धा मिळत नाही. हा सर्व परिसर ऊस तोडणी कामगारांचा आहे. यापूर्वी गावची यात्रा करून परिसरातील कामगार ऊस तोडण्यासाठी विविध कारखान्यांवर जात. यावर्षी मात्र गाळपासाठी ऊस अत्यंत कमी असल्याने मिळेल ते पदरात पाडून घ्या, या भावनेने तोडणी कामगार दसऱ्यापूर्वीच विविध कारखान्यांकडे रवाना झाले.

कलाकारांच्या हजेऱ्यांच्या कार्यक्रमांमध्ये यंदा शांताबाई जाधव तमाशा मंडळ व हरिभाऊ बडे सह ढोलकी सम्राज्ञी शिवकन्या बडे नगरकर तमाशा मंडळांनी हजेरी लावून आपली कला सादर केली. या दोन्ही मंडळाच्या कलेला उपस्थित रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. ढोलकी सम्राट शिवकन्या बडे यांचा नुकताच अपघात झाल्याने सध्या त्या रुग्णालयात दाखल आहेत. मात्र कुटुंबाची वार्षिक परंपरा खंडित पडू नये म्हणून त्यांच्या मंडळांनी गडावर जाऊन हजेरी लावली यावेळी चर्चा करताना ज्येष्ठ तमाशा कलावंत शांताबाई जाधव म्हणाल्या, गेल्या ४० वर्षांपासून मोहटादेवी गडावर हजेरी देण्यासाठी आपण न चुकता येतो. एका तमाशा कुटुंबात वीस नृत्यांगना, गायक, वादक, कामगार अशा सुमारे ७० कुटुंबांचे हातावर पोट असते. व्यवसाय होऊ न होवो या कलाकारांना रोजंदारी द्यावीच लागते. राज्य शासनाने तमाशा कलावंतांना दरमहा मासिक मानधन व सार्वजनिक वितरण व्यवस्थे मार्फत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करावे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शनिवार, दि.२४ ऑक्टोबर २०२६ । पान ८

कोकणातील वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणार

धरणांतील गाळ काढून साठवण क्षमता वाढविण्यावर भर

नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य : जलसंपदामंत्री विखे पाटी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : कोकणातून समुद्राला वाहून जाणारे पाणी नाशिक, अहिल्यानगर आणि जायकवाडीच्या परिसरात वळवून गोदावरी खोरे कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर राज्यातील धरणांमधील गाळ काढून पाणीसाठवण क्षमता वाढविण्याच्या धोरणावर जलसंपदा विभाग काम करीत आहे, अशी माहिती जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. वाघाड प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था आणि पालखेड पाटबंधारे विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाघाड धरण जलपूजन सोहळा आणि पाणी वाटप संस्थेच्या सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्राचे प्रमुख गुरुमाउली अण्णासाहेब मोरे यांच्या उपस्थितीत जलपूजन करण्यात आले. औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ अध्यक्षस्थानी होते.

विखे पाटील म्हणाले, नाशिक जिल्ह्यातील शेतकरी प्रगतिशील असून फळबागा, आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध कृषी प्रयोगांच्या माध्यमातून त्यांनी



शेतीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतीच्या विकासासाठी पाण्याचे योग्य नियोजन आणि पाणी वापर संस्थांची प्रभावी भूमिका महत्त्वाची आहे. वाघाड प्रकल्पातील पाणी वापर संस्थेने केलेले काम उल्लेखनीय असून, संस्थेला राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी पदाधिकारी आणि शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब आवश्यक

बंद पडलेल्या पाणी वापर संस्था पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. पाणीपट्टीची नियमित वसुली करून त्यातून मिळणारा निधी कालव्यांची दुरुस्ती आणि देखभालीसाठी वापरणे आवश्यक आहे. धरणातून सोडण्यात येणारे पाणी, त्याचे वितरण आणि प्रत्यक्ष वापर यावर काटेकोर लक्ष ठेवावे. पाणीगळती आणि अपव्यय रोखून उपलब्ध जलसाठ्याचा अधिकाधिक क्षेत्राला लाभ मिळेल, यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे. उल्हास-गोदावरी प्रकल्पाच्या अनुषंगाने तीन सर्वेक्षणे पूर्ण झाली असून, ९१ टक्के पाण्याची उपलब्धता होण्यासंदर्भातील माहिती समोर आली आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि जायकवाडीच्या परिसरात पाणी वळविण्याला प्राधान्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गाळ काढण्यासाठी अभ्यास व कार्यवाही

धरणांमध्ये साचणाऱ्या गाळामुळे पाणीसाठवण क्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे वाघाड धरणातील गाळाचे प्रमाण, तो काढल्यानंतर वाढणारी साठवण क्षमता आणि आवश्यक उपाययोजनांचा संबंधित विभागाने अभ्यास करावा. नियमानुसार आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असे विखे पाटील यांनी सांगितले. कालव्यांची दुरुस्ती आणि पाणीगळती रोखणे हेही सिंचन व्यवस्थापनाचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी चारा डेपो सुरू करण्याचे नियोजन असून, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी वाघाड धरणातील गाळ काढून साठवण क्षमता वाढविण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याची सूचना केली. धरणाच्या सर्वांगीण विकासासाठी कृती समिती स्थापन करावी, तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटकांच्या सोयीसाठी विश्रामगृह उभारण्याबाबत नियोजन करावे, असे ते म्हणाले. यावेळी खासदार भास्कर भगरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने यांनी प्रास्ताविकात विविध प्रकल्पांची माहिती दिली. कार्यक्रमास जलसंपदा विभागाचे अधिकारी, पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

श्रीरामपूर – नेवासा रोडवर मालवाहतूक ट्रक ॲम्ब्युलन्सचा भीषण अपघात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वडाळा महादेव : श्रीरामपूर शहरातील नेवासा रोडवर शुक्रवारी रात्री साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास मालवाहतूक ट्रक आणि म्ब्युलन्स यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात म्ब्युलन्सच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, म्ब्युलन्स चालक जखमी झाला आहे. जखमी चालकाला वैद्यकीय उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे.तसेच टूकचे पुढील दोन्ही चाके निखळुन बाहेर आहे आहे मिळालेल्या माहितीनुसार, नेवासा रोडवर मालवाहतूक ट्रक आणि म्ब्युलन्स यांच्यात जोरदार धडक झाली. या धडकेमुळे म्ब्युलन्सचा पुढील भाग पूर्णपणे चेपला गेला असून, वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी मदतकार्य सुरू केले.

जखमी चालकाला पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले. अपघातग्रस्त वाहनांचे क्रमांक मालवाहतूक ट्रक : एम एच १४ बि जे ६ ७ ६ ७ म्ब्युलन्स : एम एच १६ सी सी ७५ १७ असुन नेवासा रोडवर वारंवार अपघात होत असल्याने या मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. रस्त्याची अपुरी रुंदी आणि वाढती वाहतूक यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याची चिंता स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. या मार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण करावे, आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात आणि संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या अपघाताचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

बतावणी करून वृद्ध महिलेचे सोने लुटणारा जेरबंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : पीकविम्याच्या रकमेचा धनादेश आल्याची बतावणी करून ज्येष्ठ महिलेचा विश्वास संपादन करत तिचे सोन्याचे दागिने लुटणाऱ्या आरोपीला पारनेर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ३ लाख १५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पारनेर तालुक्यातील नवले वाडी कान्हूर पठार येथील सुमन नारायण नवले (वय ७०) यांना आरोपीने पीकविम्याचा एक लाख रुपयांचा धनादेश आल्याचे सांगून बँकेतून पैसे काढून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन ज्ञानदेव हरिभाऊ चेडे (वय ४२) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने अशाच प्रकारे दोन गुन्हे केल्याची कबुली दिली.

या कारवाईत पारनेर पोलिस ठाण्यातील दोन्ही गुन्ह्यांचा उलगडा झाला. आरोपीकडून १६ ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांनी अनोळखी व्यक्तींकडून आर्थिक व्यवहार करताना सतर्क राहावे तसेच कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

गर्दी घटली, श्रद्धा दुखावली ? शिर्डीच्या दसरा उत्सवातून आत्मपरीक्षणाची गरज

पुण्यतिथी उत्सवात अपेक्षेपेक्षा कमी भाविक; संस्थान, नगर परिषद आणि व्यावसायिकांच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह



अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : साईबाबांची कर्मभूमी असलेल्या शिर्डीत विजयादशमीला होणाऱ्या पुण्यतिथी उत्सवासाठी दरवर्षी देशभरातून लाखो भाविक दाखल होतात. मात्र, यंदाच्या १०८ व्या पुण्यतिथी उत्सवात अपेक्षेच्या तुलनेत भाविकांची गर्दी कमी झाल्याचे चित्र दिसले. संस्थानने केलेली जय्यत तयारी आणि प्रत्यक्षातील भाविकांची उपस्थिती यातील तफावतीमुळे शिर्डीच्या धार्मिक पर्यटनासह स्थानिक अर्थव्यवस्थेच्या भवितव्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. गर्दी कमी होण्यामागील नेमकी कारणे शोधून संबंधित यंत्रणांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

१९ ते २१ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या उत्सवासाठी साईबाबा संस्थानने समाधी मंदिर २४ तास खुले ठेवण्यासह सुमारे ९४ हजार चौरस फुटांचा मंडप, ४५ फुटांचा 'साई द्वारकाधीश' देखावा, निवास आणि महाप्रसादाची व्यवस्था केली होती. मात्र, अपेक्षित गर्दी न झाल्याने नियोजनाचा आढावा घेण्याची गरज व्यक्त होत आहे. ऑनलाइन दर्शन सुविधा आणि थेट प्रक्षेपणामुळे काही भाविक प्रत्यक्ष येण्याऐवजी घरून दर्शन घेत असण्याची शक्यता आहे. मात्र, गर्दीतील घटेचे कारण केवळ डिजिटल सुविधांना मानता येणार नाही. मागील वर्षांतील अधिकृत भाविकसंख्या, निवास नोंदी आणि उत्सवाच्या खर्चाची तुलना करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे.

शहरातील वाहतूक, पार्किंग, स्वच्छता, निवास आणि खाद्यपदार्थांचे दर हेही भाविकांच्या अनुभवावर परिणाम करणारे घटक आहेत. हॉटेल व्यावसायिक, हार-फूल विक्रेते, लहान व्यापारी आणि वाहतूक व्यावसायिकांना गर्दी घटल्याचा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. वाजवी दर, उत्तम आदरातिथ्य, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सवलतींची पॅकेजेस यांद्वारे भाविकांचा मुक्काम वाढविण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. संस्थान प्रशासन, नगर परिषद, ग्रामस्थ आणि व्यापारी संघटनांनी समन्वय समिती स्थापन करून उत्सवांचे दीर्घकालीन नियोजन करावे. भाविकांच्या संख्येचा अभ्यास, खर्चाचे वास्तववादी नियोजन आणि शहरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्यास शिर्डीच्या धार्मिक पर्यटनाला चालना मिळू शकते.

पादुका दर्शन सोहळ्यांचा गर्दीवर परिणाम झाला का?

ॲड. ठुबे यांनी साईबाबांच्या पवित्र पादुका परराज्यात नेऊन आयोजित करण्यात येणाऱ्या दर्शन सोहळ्यांचा शिर्डीतील पुण्यतिथी उत्सवातील भाविकसंख्येवर परिणाम झाला का, याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मागील काही वर्षांतील भाविकसंख्या, निवास नोंदी आणि दर्शनाची अधिकृत आकडेवारी जाहीर करून पादुका सोहळ्यांचे लाभ-खर्च तपासावेत, असे त्यांनी म्हटले आहे. दौऱ्यांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रवास, निवास, भोजन, प्रायोजक निधी आणि देणग्यांच्या नोंदींची बिले व मंजुरी आदेशांसह पडताळणी करावी. पादुका दौऱ्यांसाठी स्पष्ट धोरण, खर्चमर्यादा आणि पारदर्शक लेखापद्धती निश्चित होईपर्यंत हे दौरे तात्पुरते थांबवावेत, अशीही त्यांची मागणी आहे. या आरोपांबाबत संस्थानची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही.

स्थानिक यंत्रणांनी समन्वय वाढवावा

गर्दी कमी झाल्याने भाविकांना सुलभ दर्शन मिळाले असले, तरी स्थानिक व्यापारावर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. संस्थानने उत्सवाच्या नियोजनात मागील वर्षांच्या आकडेवारीचा आधार घ्यावा. नगर परिषदेने रस्ते, वाहतूक, पार्किंग आणि स्वच्छतेवर भर द्यावा. हॉटेल व्यावसायिकांनी वाजवी दर आणि सवलतींची पॅकेजेस उपलब्ध करून द्यावीत. भाविकांचा विश्वास, समाधान आणि शिर्डीतील मुक्काम वाढविण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

'बॉसला आडवा येतो' म्हणत नितीन गाडे यांना शॉकअपच्या रॉडने मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : 'दोन वेळा बॉसने समज देऊनही हा ऐकत नाही. बॉसला आडवा येतो. आज याला जिवंत सोडायचे नाही,' असे म्हणत दोन अज्ञात आरोपींनी नितीन गाडे यांना दगड व दुचाकीच्या शॉकअपच्या रॉडने बेदम मारहाण केली. तसेच त्यांच्या खिशातील सात हजार रुपये काढून घेतल्याची घटना गुरुवारी (दि. २२) दुपारी राहुरी शहरातील शिवचिदंबर मंगल कार्यालयाजवळ घडली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नितीन नंदकिशोर गाडे (वय ३७, रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) हे गुरुवारी दुपारी सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास राहुरीहून मोटारसायकलवरून बारागाव नांदूर येथे घरी जात होते. शिवचिदंबर मंगल कार्यालयाजवळ विनानंबरच्या होंडा शाइन मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना थांबण्याचा इशारा केला. त्यानंतर त्यांच्यापैकी एकाने गाडे यांना दगड व शॉकअपच्या रॉडने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी दुसऱ्या आरोपीने 'याच्या डोक्यात रॉड घालून याचा मेंदू बाहेर काढ. याला आज जिवंत सोडू नको. दोन वेळा बॉसने समज देऊनही हा ऐकत नाही,' असे म्हणत शिवीगाळ केली. त्यानंतर दोघांनी पुन्हा मारहाण केल्याचे गाडे यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे. आरोपींनी त्यांच्या खिशातील सात हजार रुपये रोख रक्कम काढून घेतल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या हल्ल्यात गाडे गंभीर जखमी झाले असून, अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. रुग्णालयात पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला. त्यानुसार राहुरी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटाळा पुढील तपास करीत आहेत.

समता पतसंस्थेची बदनामी प्रकरणी प्रशांत सोनवणेविरुद्ध ५०० कोटींचा दावा

न्यायालयाचा समन्स नोटीस बजावण्याचा आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेबाबत युट्युबवर चुकीचे वृत्त प्रसिद्ध करून संस्थेची बदनामी केल्याप्रकरणी पाथर्डी येथील प्रशांत बाळासाहेब सोनवणे यांच्याविरुद्ध पतसंस्थेने ५०० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. अहिल्यानगर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात हा दावा दाखल करण्यात आला असून, न्यायालयाने सोनवणे यांना समन्स नोटीस बजावण्याचा आदेश पारित केला आहे. या प्रकरणी समता पतसंस्थेने ड.विजय गवांदे यांच्या मार्फत प्रशांत सोनवणे यांना कायदेशीर नोटीस पाठवली होती. युट्युब व फेसबुकवरील संबंधित वृत्त डिलीट करावे, संस्थेची लेखी माफी मागावी, तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि वृत्तपत्रांमध्ये जाहीररीत्या माफी प्रसिद्ध करावी, अशी मागणी नोटिशीद्वारे करण्यात आली होती. मात्र, नोटिशीनुसार माफी न मागितल्याने आणि संबंधित वृत्त सोशल मीडियावरून हटवले नसल्याने पतसंस्थेने न्यायालयात ५०० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. संस्थेची प्रतिमा मलिन करणारे वृत्त प्रसिद्ध केल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. या दाव्याच्या अनुषंगाने अहिल्यानगर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयाने प्रशांत बाळासाहेब सोनवणे यांना समन्स नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे.

नवीन आरोग्य उपकेंद्रांना मंजुरी द्या ; आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व तत्काळ प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी दहा गावांमध्ये नवीन आरोग्य उपकेंद्रे सुरू करण्याची मागणी आ. विवेक कोल्हे यांनी केली आहे. यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्र देऊन आरोग्य विभागाच्या बृहत कृती आराखड्यात संबंधित गावांचा समावेश करून नवीन आरोग्य उपकेंद्रांना मंजुरी देण्याची मागणी केली आहे. तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती, वाढती लोकसंख्या आणि नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधांसाठी करावा लागणारा प्रवास लक्षात घेता, काही गावांमध्ये नवीन आरोग्य उपकेंद्रे सुरू करणे गरजेचे असल्याचे आ. विवेक कोल्हे यांनी पत्रात नमूद केले आहे. कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी, खिर्डी गणेश, टाकळी, माहेगाव देशमुख, कारवाडी मोतीनगर (सुरेगाव), नऊचारी (संवत्सर), माळवाडी (कोकमठाण), तिळवणी आणि जेऊर पाटोदा या दहा गावांमध्ये नवीन आरोग्य उपकेंद्रे सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या बृहत कृती आराखड्यामध्ये वरील दहा गावांचा समावेश करून तेथे नवीन आरोग्य उपकेंद्रे सुरू करण्यास मंजुरी द्यावी. यासाठी संबंधितांना आपल्या स्तरावरून तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी आ. विवेक कोल्हे यांनी मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे.

जिल्हा बँकेचे १२ साखर कारखान्यांकडे २ हजार ७८० कोटींचे कर्ज



शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : बिनविरोधाला सुरुंग लागल्यानंतर जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यांकडे सुमारे २ हजार ७८० कोटी रुपयांचे कर्ज असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीची रणधुमाळी सध्या ऐन रंगात आली आहे. सर्व सामान्य जनतेला दुष्काळाचे डोस पाजत असताना राजकीय पक्षांचे नेते आणि दिग्गज उमेदवार आपापली जागा कशी सुरक्षित राहील यासाठी पडद्यामागे तडजोडींच्या खलबतांमध्ये व्यस्त आहेत. या सगळ्या राजकीय साठमारीत शेतकरी, सभासद आणि मतदार मात्र पूर्णपणे वाऱ्यावर सोडले गेल्याचे चित्र जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. जिल्हा बँकेच्या सत्तेच्या चाव्या हाती घेण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या जिल्हा पातळीवर मॅरेथॉन बैठका झाल्या. काही जागांवर तडजोड करून निवडणूक बिनविरोध करण्यात आल्या. आता उर्वरित जागांवर या साऱ्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. या राजकीय घडामोडींमध्ये शेतकर्यांच्या कर्जमाफीचे रखडलेले प्रश्न, पीक विम्याची रक्कम मिळण्यात येणाऱ्या अडचणी, नवीन विकास सोसायट्यांचे सक्षमीकरण आणि बँकेच्या कर्जवाटपातील सुलभता या मुख्य मुद्द्यांवर एकही नेता बोलायला तयार नाही. अगोदर बँक पदरात पाडून घ्या आणि नंतर ओरबाडण्याचे नियोजन करू असा चंग या नेत्यांनी बांधला आहे. निवडणूक आली की नेत्यांना मतदारांची आठवण येते, पण यंदा पक्षीय पातळीवरील समीकरणांमुळे थेट मतदारांशी संवाद साधणेच नेत्यांनी बंद केले आहे. ठराव आणि मते केवळ नावालाच वापरली जात असल्याची भावना या मतदारांमध्ये आहे. प्रारूप आणि अंतिम मतदार याद्यांमधील हरकती आणि गोंधळानंतर आता मतदारांना प्रत्यक्ष प्रचारादरम्यान गृहीत धरले जात असल्याचा आरोप होत आहे. सहकार क्षेत्रातील या सर्वात मोठ्या बँकेच्या निवडणुकीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल आणि बँकेचे भवितव्य पणाला लागलेले असताना, निवडणुकीचा प्रचार मात्र केवळ व्यक्तिगत हेवेदावे आणि पक्षांतर्गत वर्चस्वाभोवतीच फिरत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी कर्जाचा पुरवठा वेळेवर कसा होणार, बँकेचा एनपीए कमी करण्यासाठी काय उपाययोजना करणार, यावर कोणत्याही पॅनेलकडे ठोस कार्यक्रम जाहीर झालेला नाही.